छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९३४
वर्ष १२ अंक १०

मूल्य रुपये पंधरा

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

निसर्गचित्र

(संदर्भ : अंकातील ‘चित्रगोष्टी’ लेखमालेतील लेख)



चित्रे – चित्रा वैद्य

रेषासंवाद

रस्त्यावरील खड्डे ओलांडण्याची घरच्या घरी प्रॅक्टीस करीत आहेत.

मी नेमकं उलटं करतो. हवामान खात्याने कडकडीत उन पडणार असं जाहीर केलं की, मी रेनकोट–छत्री घेऊनच बाहेर पडतो.

चित्रे : खलील खान

*

छात्र प्रबोधन

२० वर्षांची वाटचाल

२४० वा अंक !

छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९३४। वर्ष १२ अंक १०

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२)

प्रकाशन दिनांक - १० आषाढ, शके १९३४/१ जुलै २०१२

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

२.	**संवाद**	- महेन्द्र सेठिया
३.	ललित... **पाऊस तुझा माझा...**	- कविता मेहेंदळे
७.	कथा... **नकुल**	- सरोज चौगुले
११.	माहितीपर... **रुपयाची कहाणी !**	- अरविंद परांजपे
१४.	कविता... **आभाळच आले हातांमध्ये**	- आश्लेषा महाजन
१५.	उजळती वाट... ८... **निरोप घेताना**	- डॉ. स्वर्णलता भिशीकर
१९.	चित्रगोष्टी - ६ ... **निसर्गचित्र**	- चित्रा वैद्य
२१.	माहितीपर... **लंडन कॉलिंग**	- सुरेंद्र पाटसकर
२५.	व्यक्तिपरिचय... **उजाडत आहे रे - डॉ. सुधा कांकरिया**	- शैलजा देशमुख
२९.	ललित... **दिंडी चालली तीर्थक्षेत्राला**	- कु. अपूर्वा कारंडे

याशिवाय - दिनविशेष (६,३२), जरा हसूया (६), श्रद्धांजली (१३), छात्र प्रबोधन द्विदशकपूर्ती निवेदन, पुस्तक आपुला सखा (१८), मुखपृष्ठ चित्रकार परिचय (२८), जोडीकार्य (३१), 'क्लिक'करण्यापूर्वी (३२)

पद्य... जाग हे शार्दूल जाग (मलपृष्ठाच्या आतील पानावर) - सुहासिनी देशपांडे

या अंकातील पानांखालील काव्यपंक्ती कवी मुबारक शेख यांच्या आहेत.

मुखपृष्ठाविषयी - राजस्थानमध्ये दगडावरील कोरीव कामाची मोठी परंपरा आहे. अनेक राजवाडे, हवेल्या यांच्या प्रवेशद्वारापासूनच अप्रतिम शिल्पकाम पाहायला मिळते. जैसलमेर मधील अशाच एका हवेलीच्या प्रवेशद्वारावरील हे हत्तीचे शिल्प मुखपृष्ठावरील या चित्राचा विषय आहे.

रेषेतून होणारी भावाभिव्यक्ती आणि अलंकरण यांचा अनोखा संगम या चित्रात केला आहे. या चित्रात आलंकारिक शिल्प आणि त्यावर पडलेला प्रकाश अशा दोन्ही गोष्टी एकत्रितपणे चित्रित केलेल्या आहेत. हीच या चित्राची संकल्पना आहे. चांगल्या संकल्पनेच्या प्रभावी आविष्कारासाठी ॲक्रेलिक माध्यमाची निवड केली. प्रथम गडद रंगांनी सावल्यांचे काम करून घेतले, नंतर प्रकाशाची बाजू रंगविली. यात ड्राय ब्रश तंत्राचा वापर केला आहे. **- राहुल देशपांडे**

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया

कार्यकारी संपादक
जयश्री काटीकर

संपादक मंडळ
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

मुखपृष्ठ - राहुल देशपांडे

मलपृष्ठ प्रकाशचित्र - ललित

आतील चित्रे
अभय पुरंदरे, ऋजुता घाटे,
ओंकार इनामदार

वार्षिक वर्गणी : ₹ १८०
द्वैवार्षिक : ₹ ३४०
त्रैवार्षिक : ₹ ५००
दशवार्षिक : ₹ १,५००

या अंकाची किंमत : ₹ १५
पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी- प्रतिवर्षी ₹ ४० जादा

संपर्क पत्ता
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org
ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

संवाद

प्रिय ऊर्जासंपन्न प्रबोधकांनो,

या अंकाबरोबरच 'छात्र प्रबोधन'च्या वाटचालीला २० वर्षे पूर्ण होत आहेत याचा मनापासून आनंद होतोय. १२ वर्षं पूर्ण झाली तेव्हा 'तपपूर्ती'च्या वेळी मी असं म्हटलं होतं की, 'छात्र प्रबोधन' हे मासिक निव्वळ संपर्काचं माध्यम न राहता विद्यार्थ्यांच्या चळवळीचं एक महत्त्वपूर्ण साधन व्हायला हवं. गेल्या ८ वर्षांत त्यादृष्टीने निश्चितच काही प्रयत्न झाले. डोंबिवली, बोरीवली, कल्याण येथे 'प्रबोधक मंडळे' सुरू झाली. शहरी व ग्रामीण शाळांमध्ये 'प्रबोधन तासिका' सुरू झाल्या, गावोगावी दिवाळी अंकांशी निगडित विद्यार्थ्यांचे मेळावे झाले. 'सृजनाला पंख नवे' या अंकातील साहित्यावर सादरीकरणाच्या स्पर्धा झाल्या. पूर्णतः विद्यार्थ्यांच्या लेखन-संपादन-चित्रांमधून साकारलेले विद्यार्थी विशेषांक दरवर्षी अधिक गुणवत्तापूर्णरितीने प्रकाशित झाले. सभासदांसाठी अनुभव संपन्न करणारा 'जोडीकार्या'चा उपक्रम आकार घेऊ लागला.

अर्थात या सर्वच उपक्रमांची व्याप्ती व संख्या अजून खूप वाढायला हवी आहे. गावोगावी 'प्रबोधक मंडळे' अन् 'प्रबोधन तासिका' सुरू व्हायला हव्या आहेत. यासाठी तुमच्या पालकांना, शिक्षकांना आमच्याशी संपर्क करायला सांगाल का? त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य छात्र प्रबोधनकडून मिळेल. त्यांनी फक्त विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आठवड्यातून ३-४ तास वेळ द्यायला हवा. ठिकठिकाणी 'छात्र प्रबोधन'चे 'विद्यार्थी वार्ताहर', 'विद्यार्थी प्रतिनिधी' तयार व्हायला हवे आहेत. तुम्ही त्यात पुढाकार घेऊ शकाल का? पत्र पाठवा/SMS करा, तपशील कळवू. 'छात्र प्रबोधन' मासिकाबद्दलच्या तुमच्या प्रतिक्रिया-अपेक्षा तर तुम्हाला प्रत्येकालाच छात्र प्रबोधनकडे पाठवता येतील. तुमच्या पत्रांमुळे तुम्ही आमच्यासोबत आहात, मासिकाचे चाहते, प्रतिसादी वाचक आहात, हे आम्हाला कळेल. पुढच्या वाटचालीला त्यातून नक्कीच बळ मिळेल.

'छात्र प्रबोधन'च्या द्विदशकपूर्ती वर्षात काही ठिकाणी सभासदांचे, लेखकांचे, हितचिंतकांचे मेळावे होतील. छात्र प्रबोधनच्या वाटचालीवर आधारित चित्रफीत तयार होईल, एक प्रदर्शन तयार होईल. छात्र प्रबोधनद्वारा होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर होईल, या सगळ्यांमध्ये तुमचा उत्स्फूर्त सहभाग मिळावा ही अपेक्षा. छात्र प्रबोधनच्या पुढील दहा वर्षांच्या वाटचालीचेही भविष्यचित्र रंगवले आहे. त्याबद्दल अधिक तपशील पुढच्या अंकात लिहीन.

'छात्र प्रबोधन' मासिक ज्या शैक्षणिक, सामाजिक संस्थेद्वारा प्रकाशित होत असते, त्या आपल्या 'ज्ञान प्रबोधिनी'लाही यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्याच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमांचे तपशील पुढील महिन्याच्या 'प्रबोधिनी सुवर्णमहोत्सवी' विशेषांकात जाहीर होतील. त्यामध्येही तुम्ही सर्वांनी उत्साहाने सहभागी व्हावे.

नेहमीचा पुस्तकी अभ्यास करता करता तुमच्याकडे असलेल्या प्रचंड ऊर्जेला या उपक्रमांमधून प्रवाहित करा. ती अधिक संपन्न करा. खरं तर तुमच्यापैकी प्रत्येकामधे खूप ऊर्जा दडलेली आहे, पण बहुतेकांच्या बाबतीत आळसामुळे, उदासीनतेमुळे, ताणामुळे, अडथळ्यांमुळे ती बाहेरच येत नाही किंवा अनावश्यक, विद्ध्वंसक, अनुत्पादक अशा गोष्टींमध्ये ती मोठ्या प्रमाणावर वाया तरी जाताना दिसते. हे दोन्ही कसं टाळता येईल? अधिक विधायक, उत्पादक गोष्टींमध्ये स्वतःला अधिकाधिक कर्तृत्वसंपन्न बनवण्यासाठी या ऊर्जेचा वापर कसा करता येईल? यासाठी छात्र प्रबोधनमधील पुष्कळसे लेख आणि विशेषत्वाने 'उजळती वाट' ही लेखमाला तुम्हाला नक्की उपयोगी पडेल.

आपल्यातल्या या ऊर्जेला कष्टाचं, अनुभवांचं, विचारांचं, प्रेमाचं, आपुलकीचं खतपाणी घालणाऱ्या व्यक्तींबद्दल गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने कृतज्ञता व्यक्त करायला विसरू नका. पावसाने प्रारंभीच दडी मारली असली तरी लवकरच तो प्रसन्न होऊन बरसेल. अशा पावसात डोंगर-दऱ्यातल्या सहलीला, शेतात भातलावणीला जायचंच, असं ठरवून टाका. लंडन येथे या महिन्यापासून सुरू होणाऱ्या ऑलिंपिक्सची क्षणचित्रे, प्रेरणादायी लढती आवर्जून पाहा.

यासर्वांमधून तुम्ही अधिकाधिक ऊर्जासंपन्न-समृद्ध व्हावं म्हणून तुम्हाला भरभरून शुभेच्छा!

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

आनंदाचं फुलझाड आपणच आपल्या अंगणात लावायचं ।
येणाऱ्या प्रत्येक दिवशी आपलं आपणच दरवळायचं ।।
प्रायोजक - शंतनू पटवर्धन, टेक्सास अमेरिका

पाऊस तुझा-माझा

कविता मेहेंदळे

वाटत होतं तस्संच झालं. दुपारी दोन-अडीच वाजेपर्यंत कश्शाचा मागमूस देखील नव्हता अन् अचानक दिशा काजळल्या. वारा सुसाटला. धूळ, कागद-कपटे, वाळकी पानं त्या वाऱ्याच्या वेगाबरोबर गरागर फिरक्या घेऊ लागली. पक्षीही या हवेतल्या अचानक बदलाने गोंधळले. सैरावैरा आडोसा शोधू लागले. ही वातावरणातली तारांबळ मजेत पाहात पाऊस टपाटप धरणीवर कोसळू लागला. टपोऱ्या थेंबांच्या आता जलधारा झाल्या. सपासप पाऊस फटकारू लागला. भणाणणारा वारा त्या जलधारांसह नाचत होता. हा हसरा-नाचरा-नटखट पाऊस सर्वांना हवा होता. झाडं, घरं, रस्ते, माणसं सर्वांच्या डोळ्यांत तुडुंब आनंद भरला. वळवाच्या या पावसानं तप्तपणा वाहून नेला होता. गरमीला काही काळ का होईना उतारा पडला होता.

वळवाचा गरजणारा पाऊस म्हणजे वर्षाऋतूची नांदीच म्हणायला हवी. 'मी आलोच' चा सांगावा घेऊन येतो हा पाऊस! कधी कधी तर गारांचाही वर्षाव होतो. एरवी कुठला मारा सहन न करणारे आपण गारांचा मारा मात्र मजेत झेलतो.

मान्सून केरळमध्ये दाखल झाला की चार दिवसांत पुढे म्हणजे महाराष्ट्रात आपल्याकडे येणार, सरकणार हे ठरलेलेच आहे. हो ना, हा पाऊस चक्क लहरीपणाने वागतो, पण जरा मागे पुढे करीत येतोच. आपण तयारीत असतो. छत्र्या, बूट, रेनकोट, दप्तरासाठी प्लॅस्टिक कव्हर्स अगदी दणक्यात खरेदी करतो. अगदी खरं खरं विचारलं तर आपल्याला पावसात चक्क भिजायचं असतं.

छत्री घेऊन पहिल्या पावसात भिजायला गेलेली मयुरी गच्चीतून हाका मारते,

''आई आऽ ऽ ई गऽ ऽ! लवकर ये ना भिजायला...''

''तू भिजलीस का?''

''हं! वाऱ्यानं छत्री उल्टी-पाल्टी करून टाकली.''

''वेडी झालीयस का? खाली ये आधी.''

''च्याकऽ ऽ ऽ... तूच गच्चीत ये''

''अग पण...''

''परवा म्हणत होतीस, पहिल्या पावसात भिजलं की सर्दी-पडसं होत नाही.''

मयुरी आईला ओढत-ओढत गच्चीवर घेऊन जाते. मला सांगा, एरवी आईने मयुरीचं गच्चीत घेऊन जाणं इतकं सहजपणे घेतलं असतं? पण मनातल्या कोपऱ्यात आईचं बालपण जागं होतं आणि आईलाच चिंब- चिंब भिजायचं होत. पहिल्या पाऊसधारांमध्ये झोकून द्यायचं होतं. अनिवार ओढ लावणारा हा पाऊस खरंच किती आतुरतेने भेटतो! तनमन ओलं होतं!!

ज्येष्ठ-आषाढ महिन्यातला कोकणातला पाऊस म्हणजे मैदानात

निर्मळ पाऊसधार पृथ्वीच्या अंगणी येते । कणाकणातून माती गीत सृजनाचे गाते ।।

प्रायोजक – डॉ. मुकुंद करंबेळकर, चाळीसगाव

उतरल्यावर धडाधड सर्व गडी बाद करून आपल्या हद्दीत (मैदानात) परतणारा वीरश्री कबड्डीपटूच जणू! चार-चार दिवस अखंड कोसळतो. तो मुसळधार पडतो. सूर्यदर्शन होत नाही की कुणाला घराबाहेर पडू देत नाही. अगदी नाईलाजाने कामावर जावं लागणारच असेल तर भिजण्याच्या तयारीनेच जायचं. हात-पाय-डोकं नक्कीच ओलं होतं. रस्त्यातून लाल मातीचे पाट वाहात असतात. अंगणातल्या पागोळ्यांनी अंगणात खड्डे पडतात. कौलारू घरातून आंत कुठेतरी गळत असतं. नारळ-सुपारीची झाडं वर्षभराची आंघोळ उरकून घेतात. शाळांना नक्कीच सुट्टी मिळते. सागरकिनारे खवळतात. उंच-उंच लाटा मोठ्या जोमाने उसळतात. अशा पाण्याच्या रुद्रावतारात होड्या नांगरणं शक्यच नसतं. शेतकरी वाट पाहात असतो, की पहिला पाऊस उघडल्यावर भाताची पेरणी करू.

कोकणात, सागर किनाऱ्यांवर असा धिंगाणा घालणारा पाऊस, घाटावर मात्र अचानक 'दडी' मारून बसतो. गम्मत होते. आभाळ तर भरून येतं. काळे ढग 'धाक' घालतात. परंतु विजेचा कडकडाट, ढगांचा गडगडाट होतच नाही. काही वेळातच ऊन पडतं. जड झालेले ढग दूर निघून जातात; कुणाचीही परवानगी न घेता! अशी 'भुलावण' फक्त पाऊस करू शकतो.

हा पाऊस ना, चक्क लबाडपणा करतो. 'वर्कींग-डेज' असल्यासारखा सोमवार ते शुक्रवार तुरळक येतो. भुरभुरतो. पाना-फुलांवर तुषार उडवतो. गवत पात्यांवर खुद्कन हसतो. घरांवर, रस्त्यांवर खेळ-खेळ खेळतो. आकाशीची गुपितं घेऊन आल्यासारखा हळुवार, गाजावाजा न करता येतो. शनिवार-रविवार आला की दमदार कोसळतो. बाहेर जाणाऱ्यांची अडवणूक करतो. दारावर अडवणूक केल्याप्रमाणे जणू म्हणतो,

''मी आलोय ना 'पाहुणा' , बाहेर जाणार कसे सांगा ना?''

असा पाऊस मातीत झिरपतो. मातीचा लगदा करतो. चिखल, रबरबाट झाला की छोट्या सवंगड्यांना खेळायला बोलावतो. पाऊस नवीन रोपांना, कोंबांना सावरतो. मातीतलं बी रुजतं, अंकुरतं ते पावसाच्या कृपेने. सहकार्याने म्हणूया हवं तर! मुलं-मुली वर्षासहलीला भिजून चिंब होतात. जवळपासच्या निसर्गरम्य ठिकाणी जातात. सुरेखसा, लाखो तुषार उडवीत झेपावणारा धबधबा त्यांची वाट पाहात असतो. डोंगररांगांमधून असे अनेक चमचमते झरे खुणावत असतात. आपल्याच नादात उड्या मारीत उतरत असले तरी रसिक पावलांना खिळवून ठेवण्याचं कसब या धबधब्यांपाशी नक्की असतं. मखमली हिरवळीवरून वाहणारे हे जिवंत पाण्याचे झरे म्हणजे सृष्टीचं वैभव आहे.

अवघी मलिनता धुवून नेणारा पाऊस श्रावणामध्ये थोडासा स्थिरावतो. ऊन-पावसाचा लपंडाव तेव्हा सुरू असतो आणि मोहरलेल्या सृष्टीसौंदर्याच्या खुणा

। अभिनंदन... 'स्नेहालय' संस्थेचे संस्थापक गिरीश कुलकर्णी - 'पुलोत्सव कृतज्ञता सन्मान' ।
। कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ। **प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

जागोजागी फुलं आणि फुलपाखरं करून देतात. टपोरा, पोवळ्याच्या देठाचा पारिजात, मोह-गंध घेऊन उमलणारी निळी-जांभळी कृष्णकमळी, रंगांच्या महाली फुलून आलेली गुलाबाची टवटवीत, सुकुमार फुलं, स्वत:च्याही नकळत प्रेमात पाडणारा सोनचाफा, हळुवार गंधतगर... किती किती रूपातून हा मनमोहक पाऊस भेटतो! चकित करून टाकतो !!

असं असलं तरी काही प्रदेशांत पाऊस लोकांना मनधरणी करायला लावतो. तोंड दाखवून गायब होतो. मृद्‌गंध घेऊन येणारा, मोत्याच्या पिकांची स्वप्नं दाखविणारा हाच का तो 'खडूस' पाऊस, प्रश्न पडतो. आकाशातून पाण्याचं अमृत देणारा पाऊस माणसाला याचनेसाठी मान वर करायला भाग पाडतो. पर्जन्यराजाला खुश करण्यासाठी प्रार्थनाही केल्या जातात. स्वत:चं महत्त्व नीट कळून यावं म्हणून तर हा खेळगडी असा 'खट्याळपणा' करीत नसेल ना?

यानंतर येतो तेव्हा मात्र 'काही घडलंच नाहीये' अशा थाटात मैत्रीचा हात पुढे करीत येतो. 'पाण्या तुझा रंग कसा, ज्याला जसा हवा तसा' हे ब्रीद जपणारा भासतो. त्याची खोडसाळ हरकत त्याच्या शुभ्र फेसामध्ये जिरवून टाकतो. 'स्नेहाळसा' होऊन येतो.

भाद्रपदातल्या गणपती उत्सवात, आश्विनातल्या नवरात्र उत्सवात पाऊस त्याची हजेरी हटकून लावतो. पंढरपूरला वारकऱ्यांबरोबर विठूमाऊलीच्या दर्शनाला निघालेला पाऊस कार्तिकी एकादशीपर्यंत आपली साथ देतो. खात्रीपूर्वक येणार नाही म्हणून बाहेर पडावं तर फजिती पाहायला झरझर झरझर अवतरतो. सरसर येऊन गाणं गाऊन जातो. मन धुंद करतो.

किती किती पद्धतीनी पाऊस भिडत राहतो. वर्षभरातले चार महिने प्रत्यक्ष सहवास घडतो. इथे ना तिथे पाऊस आपल्याला गाठतोच. तिरका येतो, भुरभुर पडतो किंवा धो-धो कोसळतो. कळत नाही परंतु कधीसे आपण चक्क पावसाच्या प्रेमात पडतो. मनीचं 'गुज' पावसाला सांगतो आणि निश्चिंत होतो. पाऊस चुगली करत नाही, असा विश्वास असतो ना !

पावसाळा सरला तरी त्याच्या ओल्या खुणा नदी-नाले, झाडं-झुडपं, माणसं मोठ्या आत्मीयतेने सांभाळून ठेवतात. सागर किनाऱ्यावर गेलं की अथांग सागराचं निळशार पाणी रंगांची किमया खेळताना दृष्टीस पडतं. हा जलधी कधी मोरपिशी दिसतो कधी हिरवट तर कधीतरी तांबुस राखाडी सुद्धा ! मन मोहून जातं. पाण्याला रंग नाही हे सत्य मन धुडकावून लावतं.

हळूहळू डोंगर-पठाराचा परिसर शुष्क होत जातो. झाडं-पानांची हिरवी भुलावण नाहीशी व्हायला लागते. गवत-पाती पिवळी पडतात, वाळतात. सारी सृष्टी पावसाला 'साद' घालायला सुरुवात करते. सादाला प्रतिसाद हे तर निसर्गाचं तत्त्वच आहे. पुनश्च आभाळ भरून येतं. लहरत, नाचत आणि गातही पाऊस येतो. साऱ्या वातावरणात 'ताजगी' भरून टाकतो. हुरूप जागवतो. चैतन्याची लूट करतो. घरं-दारं, पानं-फुलं, कौलं-पत्रे सगळी सगळीकडची धूळ-मरगळ पाऊस दूर करतो. कंटाळा झटकून टाकतो. अगदी खरं सांगू, पाऊस आपल्या 'तना-मनाची' मलिनता आणि सुस्ती हलकेच दूर सारतो. आपल्याही नकळत !

**

–कविता मेहेंदळे
६९२/१, 'सुखदा' सोसा.
पुणे–सातारा रस्ता, पुणे 411037

२०१२ हे वर्ष
ज्ञान प्रबोधिनीचे
सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे.
त्या निमित्ताने पुढचा म्हणजेच
सौर श्रावणचा अंक
'प्रबोधिनी विशेषांक'
असणार आहे.
ज्ञान प्रबोधिनीचा इतिहास,
विस्तार, आजी-माजी
विद्यार्थ्यांची मनोगते,
गेल्या ५० वर्षातील
महत्त्वाच्या घटना-प्रसंगांच्या
कथा इ. नानाविध माध्यमातून
आपली प्रबोधिनी समजून
घेऊयात. अनेकांपर्यंत
पोहोचवूयात.

खुलला सूर्यपिसारा पहाटेच्या गर्भातुनी । तुरे सोनियाचे उगवून आले मातीतुनी ।।
प्रायोजक – श्री. अमर परांजपे, सांगली

दिनविशेषाला कृतीची जोड

सौर चैत्र अंकापासून आपण काही महत्त्वाच्या दिनविशेषांकाची माहिती अंकामधून घेतो आहोत. त्यावर आपण जागरुक विद्यार्थी म्हणून काय करू शकतो हेही समजून घेत आहोत. त्यातल्या काही गोष्टी तुम्ही प्रत्यक्षात करायलाही लागला असाल. एखाद्या महिन्यातला एखादा दिनविशेष येऊन गेला म्हणजे त्याचं महत्त्व संपलं असं होतं का? तर अजिबात नाही. तो दिवस म्हणजे आपण सतत करायला पाहिजे, अशा कामांचं स्मरण असतं. त्यामुळे गेल्या महिन्यातले दोन महत्त्वाचे दिन जागतिक पर्यावरण दिन आणि जागतिक महासागर दिन आणि त्यानिमित्ताने करायचे उपक्रम याविषयी जाणून घेऊया.

५ जून – जागतिक पर्यावरण दिन (World Environment Day - WED)



* १९७३ पासून 'युनायटेड जनरल असेंब्ली'च्या पुढाकाराने अंमलबजावणी सुरू.
* २०१२ चा विषय – 'हरीत अर्थशास्त्र', यावर्षीचे नेतृत्व – ब्राझील देशाकडे
* घोषवाक्य – 'माणसाचा चिरंजीवी विकास'

हवेतल्या ज्यादा वायूचे प्रमाण कमी करणे, नैसर्गिक स्रोतांची क्षमता वाढवणे, २०११ मध्ये भारताने ह्या दिवसाचे नेतृत्व केले होते, विषय होता 'जंगल – निसर्ग आपल्या सेवेसाठी.'

तुम्ही काय कराल? – आपल्या सभोवतालचा परिसर, पर्यावरण चांगले / स्वच्छ ठेवा.

* कोणाच्याही वाढदिवसाला एखाद्या झाडाचे रोप भेट द्या. * वाहनांचा वापर आवश्यक तेवढाच करा. त्यांची काळजी योग्य तऱ्हेने घ्या म्हणजे हवेतले कार्बनचे प्रमाण कमी राहील. * वीज, पाणी यांचा अपव्यय टाळा.
* पर्यावरण जागृतीसाठी 'रॅली' काढून योग्य संदेश पोहोचवा.

अधिक माहितीसाठी – http : //www.unep.org/wed.

८ जून – जागतिक महासागर दिन (World Ocean Day - WOD)

* २००८ पासून अंमलबजावणीला सुरुवात
* २०१२ चा विषय – युवक : बदलाची, परिवर्तनाची नवी वाट

'महासागर' ही पृथ्वीवरची (आपल्या ग्रहावरची) अतुलनीय 'परिस्थितिकी' आहे. पण मानवाच्या हस्तक्षेपामुळे त्यात प्रचंड प्रमाणात प्रदूषण होत आहे, त्यामुळे सागर संपत्तीला धोका निर्माण झाला आहे, ह्याची जाणीव जगाला व्हावी आणि महासागर प्रदूषणमुक्त कसे होतील ह्याचा विचार करण्यासाठी हा दिवस जगभर साजरा केला जातो.

हे जाणून घ्या – * जगात महासागर किती आणि कोणत्या देशांच्या जवळ आहेत? * सर्वात मोठा महासागर कोणता? त्याची लांबी / रुंदी किती आहे? * तेलवाहू जहाजांमुळे महासागरात प्रदूषण कशाप्रकारे होतं? अलीकडची तेलगळतीची मोठी घटना कोणती? * किनारपट्टीवर मोठे मासे वाहून आल्याच्या घटना घडत असतात. वर्तमान पत्रात आलेल्या अशा प्रकारच्या बातम्यांचे, प्रकाशचित्रांचे संकलन करा.

अधिक माहितीसाठी – http : //www.theoceanproject.org.

– डॉ. कांचनगंगा गंधे

जरा हसूया...

बाबा : तू अजून जगाचा नकाशा का खरेदी केला नाहीस?

सोनू : बाबा, तुम्ही तर म्हणता की, जगात खूप वेगाने बदल होतोय. मी विचार केला की, जेव्हा जग स्थिर होईल तेव्हाच नकाशा खरेदी करूया!

। जरुर शोधा - http://www.amazingpaperairplanes.com/simple.htm
(कागदाची विमाने बनवा आणि उडवा)।
प्रायोजक – श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

नकुल

– सरोज चौगुले

आमच्या गावाच्या मध्यावर गढीसारखा एक छोटासा दगडी वाडा होता. त्याला वाडा म्हणण्यापेक्षा कोंडवाडा म्हटलेलंच बरं! कारण वाड्याला ना प्रशस्त खिडक्या होत्या, ना उंच मोकळा दरवाजा! घरात माणसंही फारशी नव्हती. त्यामुळे उंदीर, घुशी, साप यांचं तिथे वास्तव्य असायचं. एकटा आमचा चुलत काकाच तिथं राहात होता. त्यानं लग्न का केलं नव्हतं याचं कारण कुणालाच माहीत नव्हतं. त्याचे आई-बाबा म्हणजे आमचे चुलत आजी-आजोबा, लवकर वारले होते. त्यामुळे या पोरक्या पोराची जबाबदारी माझ्या आजीनं स्वीकारली होती. स्वाभाविकच तो आम्हाला परका वाटत नव्हता. पण कुणी तरी त्याच्या त्या जुन्या वाड्यात गुप्त धन आहे असं त्याच्या डोक्यात भरवलं आणि वयाच्या अठराव्या वर्षी तो त्या वाड्यात हट्टानं राहायला गेला. आपला स्वयंपाक आपण रांधू लागला. माझं काम सकाळी आणि संध्याकाळी काकाला दूध नेऊन द्यायचं होतं!

हा आमचा काका मोठा कलंदर आणि करामती होता. तो माणसांमध्ये कमी आणि प्राण्यांमध्ये जास्त असायचा. गाय, बैल, शेळी, म्हैस, घोडा असे प्राणी शेतकरी पाळतात. पण यानं पाळलेले पक्षी-प्राणी वेगळेच होते! यानं दुधासारखे पांढरे शुभ्र दोन उंदीर पाळले होते. एक पंचरंगी पोपट होता. एक पिंगळा होता. एक पूर्ण काळंकुट्ट मांजर होतं. एक लांडग्यासारखा मोठ्ठाच्या मोठा कुत्रा होता. एक गडद रंगाचा पारवा होतं. या सगळ्या अक्रम चक्रम प्राणी-पक्ष्यांना तो खूप जपायचा. त्यांना खाऊ घालायचा आणि पाव्याच्या सुरावर या प्राण्यांना हलायला, डुलायला, नाचायला शिकवायचा. त्याच्या या जगावेगळ्या छंदामुळं लोकांनी त्याला वेड्यातच काढलं होतं. सगळे त्याच्यापासून दूरच राहणं पसंत करत. मला मात्र जीव मुठीत धरून त्याच्या घरात दूध देण्यासाठी जावंच लागे. सणासुदीला जेवण द्यायलाही जावं लागे. सकाळी दिवसाउजेडी मला फारसं काही वाटायचं नाही. पण संध्याकाळी-रात्रीच्या वेळी त्या अंधाऱ्या वाड्यात चाललेली ती अजब मैफल बघून भीतीच वाटायची! मी जायला कुरकुरायची! पण माझ्याशिवाय घरात लहान कुणीच नव्हतं. त्यामुळं जीव मुठीत धरून जावंच लागायचं!

अशीच एक दिवस मी रात्रीची गेले आणि घुंगुरांचा छुम् छुम् आवाज ऐकू आला. अमावस्येची रात्र, खाचखळग्याचा रस्ता. रस्त्याला दिवे वगैरे काही पद्धतच नव्हती. चिमणीतलं रॉकेल जपण्यासाठी सगळे लोक आठ-साडे आठलाच गुडुप होत असत. त्यामुळं पायांनी रस्ता चाचपडत मी वाड्याच्या दाराजवळ आले आणि तो घुंगरांचा आवाज ऐकू आला. भुताखेताच्या गोष्टी ऐकल्यामुळं

झाडास लगडले पाऊस गाणे । भिजल्या सुरात मातीचे न्हाणे ।।
प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, नॉटिंगहॅम, इंग्लंड

भीतीनं अंगावर सर्रकन काटा आला. 'हडळी सुंदर बाईचं रूप घेऊन येतात. माणसाला भुलवतात आणि त्याला मारून त्याचं रक्त पितात', असं काहीबाही ऐकलेलं होतं. त्यामुळं भीतीनं काळजाचा ठाव सुटला. ही हडळ नक्की काकाला मारणार असं वाटून हातातलं; जेवण वाढून आणलेलं ताट; तिथंच टाकलं आणि 'काका मेलाऽ! हडळीनं त्याला मारलंऽ! आबा, आई, काका मेलाऽ!!' अशी बोंब ठोकत ठेचाळत, पळत घर गाठलं. भीतीनं सगळं अंग थंडगार पडलं होतं. जीव गळाठला होता. त्यामुळं धापा टाकत मी हातवारे करत 'काका मेलाऽ!' असं पुन्हा एकदा सांगितलं आणि सोप्यात सताड आडवी पडले ती बेशुद्धच झाले.

आई, आबांचं काळीज लकाकलं. बेशुद्ध पडलेल्या पोरीला शुद्धीवर आणावं की मेलेल्या भावाकडं जावं? काहीच कळेना. तारतम्यानं त्यांनी माझी जबाबदारी भाऊ-भावजयीवर सोपवली. शेजारच्या भावकीच्या लोकांना उठवलं आणि कंदील घेऊन काकाचं घर गाठलं. काकावर मुलासारखं प्रेम करणारी माझी आई आक्रोश करत होती. सगळी मंडळी वाड्यापर्यंत आली. जेवण दारात तसंच पडलेलं बघितलं; तशी मंडळी घाबरली. दार आतून बंद असलं तर...? सगळ्यांनी जोर लावून दार उघडलं. ते एकदम सताड उघडलं गेलं. बघतात तर काय...? काका महाशय राजाच्या रुबाबात खांबाला टेकून पावा वाजवत होते आणि समोर पायात घुंगरू बांधलेला मुंगूस काकाच्या इशाऱ्यावर वेडं-वाकडं नाचत होतं. मुंगसाभोवती फेर धरून बाकीच्या मंडळींचंही समूहनृत्य सुरू होतं. हवा गेलेल्या फुग्यागत तोंडं झाली सगळ्यांची. सगळ्यांनी कपाळावर हात मारला आणि परत निघाले.

आई बाबांना हे कळत नव्हतं की, मी असं का सांगितलं? मी कशाला एवढी घाबरले? जेव्हा मी घडलेली हकिकत सांगितली तेव्हा सगळे पोट धरून हसू लागले. मला कळेना माझं काय चुकलं ते! माझा गोंधळलेला चेहरा बघून आई म्हणाली.

''अगं बाई, हडळ बिडळ काही नव्हती तिथं! तुझ्या माथेफिरू काकानं मुंगूस पाळलंय आणि त्याच्या पायात घुंगरू बांधल्यात. त्याच्या आवाजाला घाबरलीस तू!''

''नुसतं घुंगरू बांधलं न्हाईत, त्याला नाचायलाबी शिकवतुया. ते मुंगूस हिकडं-तिकडं पळालं की बाईमाणूस नाचतंय असं वाटतंय. अमुशेचा अंधार ह्यो असा! तुला वाटलं हडळीनंच काकाला मारून खाल्लं. म्हणून भ्यालीस तू! आता काळजी करू नगं, तुझा काका चांगला जिवंत हाय!' आबांनी मला समजावलं.

''जिवंत असू दे न्हाई तर मरू दे! आता मी काय त्याच्या घरला जाणार न्हाई. सांगून ठेवते!'' मी स्पष्ट सांगून टाकलं.

''बऽरं! नगं जाऊस.'' आई-बाबा बोलले.

काकानं मुंगूस पाळलं. त्याचं बारसं पण केलं. 'नकुल' नाव ठेवलं त्याचं. तो कुठं आहे ते कळावं म्हणून पायात घुंगरू बांधले. नकुल मोकळाच होता. लालसर ओठांचा, लांबुडक्या तोंडाचा, छोट्या शिंपलीसारख्या कानांचा, मण्यासारख्या तेजस्वी डोळ्यांचा, मऊ अंगाचा, झुपकेदार शेपटीचा, वेगानं पळणारा, बिळात लपणारा, राहाणारा मुंगूस काकानं पाळला तो शुभ शकुनासाठी! मुंगसाचं तोंड पाहिलं की दिवस चांगला जातो. काही तरी चांगला लाभ होतो, अशी खेडेगावात समजूत असते. आता कुठंतरी बिळात, कुंपणाच्या झाडोऱ्यांच्या गचपणात, शेणी साठवलेल्या उतरणीच्या आडोशानं राहाणारा मुंगूस आपलं शुभलक्षणी तोंड माणसाला दाखवायला रोज कशाला हो येईल? त्याच्या लहरीनं तो जाता येता दिसला तर दिसला नाही तर नाही. त्यावर आमच्या कलंदर काकानं मुंगूसच घरात आणून ठेवलं, त्यानं ते कुठून पैदा केलं कोण जाणे! मुंगसानं दोन-चारदा त्याला चकवा देऊन पळ काढला होता. पण काकानं त्याला पुन्हा पकडून आणलं होतं. खुणेसाठी त्याच्या गळ्यात पंचरंगी दोऱ्याचा गोफ बांधला होता. पायात घुंगरू बांधले होते. त्यामुळे

। जरूर ऐका... नको नको रे पावसा... - कवयित्री इंदिरा संत -गायिका पुष्पा पागधरे।

। डोळस व्हा आणि हिंमतीने पुढे चला !। **प्रायोजक – डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे**

तो चटकन सापडायचा. काका त्याला कण्या, दूध, भाकरीचा चुरा, दाणे खायला द्यायचा. त्यामुळं 'नकुल'ला त्याचा लळा लागला. तो तिथंच राहू लागला. 'कशासाठी? पोटासाठी!' या तत्त्वानं जगणाऱ्या रानटी जिवाला आयतं खाणं आणि निवांत राहाणं मिळालं की झालं. कशाला पळून जायचं? नकुलनं तोच मार्ग पत्करला. काकाजवळ निवांत राहाणं पसंत केलं. त्याला बांधूनसुद्धा ठेवायला लागत नव्हतं!

नकुलनं माणुसघाण्या काकाला माणसात आणलं. सर्वच लोकांना मुंगसाचं तोंड बघायची इच्छा असायची. ती इच्छा पूर्ण करण्यासाठी लोकांना काकाच्या घरी यावं लागायचं. गावातल्या सगळ्या लोकांना यायला लावण्यापेक्षा आपणच गावातून फिरलं तर...? काकाच्या डोक्यात विचार यायचा अवकाश, त्यानं तो अंमलात आणायला सुरुवात केली. नकुलला खांद्यावर घेऊन तो प्रभातफेरी करायचा. नकुल काकाच्या खांद्यावर बसून राहायचा. सर्वांत शेवटी काका आमच्या घरी यायचा. जरा वेळ बसायचा, बोलायचा, न्याहारी करून दूध घेऊन जायचा. तोपर्यंत नकुल सगळ्या सोप्यातनं हिकडं-तिकडं पळायचा. आमच्या अंगावरही चढायचा. सुरुवातीला मला त्याची भीती वाटायची. पण हळूहळू सवय झाली. मैत्री झाली. माझ्या मांडीवर चढून बसायचा, खांद्यावरनं हातावर घसरगुंडी करायचा खेळ त्याला खूप आवडे. माझ्या हातातला भाकरीचा तुकडा गप्पकन तोंडात घेऊन पुढच्या दोन पायात धरायचा आणि कुरूकुरू कुरतडून खायचा. त्यावेळी त्याची गडबड, पाणी पितानाची धडपड बघताना गंमत वाटे. त्याच्या झुपकेदार शेपटीवरनं अलगद हात फिरवताना मौज वाटायची. अशाप्रकारे नकुल एकट्या काकाचाच नाही, तर आम्हा सर्व मुलांचा मित्र झाला. माझी त्याची दोस्ती खूप जमली. मी त्याच्यासाठी गळ्यात घालायला लाल पिवळ्या मोठ्या मोठ्या माण्यांची माळ बनवली होती. ती त्याला खूप छान दिसायची. अशा त्या नकुलमुळं काका अंधारवाड्यातून बाहेर पडला. याचा आम्हाला आनंद झाला.

नकुलचा काकाला जसा अधिक लळा लागत होता तसं त्याचं लक्ष इतर पक्षी प्राण्यांवरून कमी होऊ लागलं. पिंगळा, पंचरंगी पोपट, पांढरे उंदीर, काळी मांजरी यांसारखे इतर पक्षी-प्राणी आणि या सर्वांच्या राखणीसाठी 'टाम्या' बाळगला होता; पण नकुल आला आणि या सर्वांचा वट कमी झाला. कारण नकुल आला आणि दोनचार महिन्यातच काकाला चांदीच्या नाण्यांनी भरलेलं मातीचं छोटंसं लोटकं मिळालं. हा त्याचा शकुन आहे असं वाटून तो नकुलचे अधिक लाड करू लागला. धन तर मिळालं, आता साऱ्यांना पाळायचं कारण काय? असं वाटून त्यानं एक दिवस पिंगळा, पोपट, पारवा यांचे पिंजरे टेकडीवरच्या रानात नेले. त्यांची दारं उघडली आणि मोकळ्या आकाशात त्यांना सोडून दिले. एके ठिकाणी जखडून राहिल्यानं उडणं विसरलेली ती पाखरं सुरुवातीला धडपडली; पण

नसे उरी आज संकटाची भीती।
मदतीस माणसे धावुनिया जाती॥

मग रानवारा पिऊन आकाशात झेपावली. काका रिकाम्या हातानं पण भरल्या मनानं परत आला.

काकाला सगळं घर सुनं सुनं वाटू लागलं. शेतीचं काम तो करतच नव्हता. पक्षी आणि प्राण्यांच्या उस्तवारीत वेळ जायचा ते कामही संपलं होतं. थोडं का होईना, धन सापडलं होतं. त्यामुळं जमीन उकरायचं कामही थांबलं होतं. आता जगण्याचं उद्‌दिष्टच संपलं होतं. त्यामुळं त्याचं जेवणाखाण्यावरचं लक्षही उडालं. त्याच्या पाव्यातले सूर संपले. उदास उदास होऊन तो एकटाच बसून राहायचा. मांजरी कुठं तरी भरकटली होती. कुत्रा इमानीपणानं परत आला होता; पण काकाला आता तो नजरेसमोर नको होता. त्यामुळं एकटा नकुल तेवढा त्याला बिलगून राहिला होता. त्यालाही कुठंतरी रानात सोडून द्यावं आणि कुठंतरी लांऽब निघून जावं असं त्याला वाटत होतं; पण कुठल्या जन्मीचे चिवट धागे जुळले होते कोण जाणे!

मीही आता मोठी झाले होते. मुंगसाशी खेळत बसावं एवढी छोटी नव्हते. आता काकाच घरी जेवायला यायचा. कधी स्वत:च रांधून खायचा. कधी उपाशीच राहायचा. नकुल भूक लागली की त्याच्याकडे वर तोंड करून आशेनं बघायचा, त्याच्या अंगाखांद्यावर बागडायचा; पण काका त्याला झिडकारायचा. म्हणायचा, ''जा की बाबा कुठं तरी, कशाला माझ्यावर जीव लावून बसलायस? मला आता काही करायची, खायची किंवा तुला खाऊ घालायची शक्ती उरली नाही. तू गेलास की मी सुटलो.'' नकुलला ते कळत होतं की नाही माहीत नाही. पण तो दूर जाण्याऐवजी काकाला अधिकच बिलगून असायचा!

उन्हाळ्याचे दिवस होते. उकाडा खूपच होत होता. लोक आपली घरं सोडून रस्त्यावर, अंगणात झोपू लागले होते. काकाच्या घराला तर अंगणच नव्हतं. घरात झोपणं शक्य नव्हतं. त्यामुळं तोही रस्त्यावर झोपला होता. नकुल त्याच्या पायावर पडला होता. मध्यरात्र टळून गेली असावी. गारव्यासाठी बाहेर पडलेले एक अस्सल नागराज सळसळत, वळवळत येत होते. काका बिचारा गाढ झोपेत होता. पण नकुलचं नाक शाबूत होतं. त्याला नागाचा वास आला. तो चमकून उठला आणि नागाच्या फण्यावरच त्याने हल्ला केला. अनपेक्षित हल्ल्यानं गोंधळलेल्या आणि चिडलेल्या नागाने नकुलला आपल्या शेपटीच्या विळख्यात करकचून आवळले. त्याला जरासुद्धा हालचाल करता येईना; पण त्याची चिकाटी इतकी होती की, सापाच्या फण्यात रुतलेले सुळे आणि नख्या अधिक अधिक खोलवर रुतवून सापाला एक इंचही तो पुढे येऊ देत नव्हता. कधी साप वर, नकुल खाली - तर कधी नकुल वर साप खाली. एकमेकांना उचलणं, उसळणं, आपटणं, घोसळणं असं ते नि:शब्द युद्ध सुरू होतं. नकुलनं फणा पकडल्यानं साप फुत्कारू शकत नव्हता. सापाच्या फण्यात सुळे रुतल्यानं नकुलही चित्कारू शकत नव्हता. पण दोन्ही योद्धे हार खात नव्हते. त्यांच्या झुंजीनं आणि नकुलच्या पायातल्या घुंगराच्या आवाजानं काका धडपडून जागा झाला. क्षणभर त्याला काय चाललंय ते कळलंच नाही. कळलं तेव्हा नकुलाचे प्राण धोक्यात आहेत असं बघून एक सोटा घेऊन त्यांने सापावर जोराचा प्रहार केला. साप लोळा गोळा झाला. त्याचे वळसे ढिले पडले. नकुलला काकानं सापाच्या विळख्यातून सोडवलं आणि छातीशी धरले. नकुलने थोडीशी धडपड केली आणि काकाच्या हातावर मान टाकली.

स्वत: मृत्यूला कवटाळून त्यानं काकाला वाचवलं होतं. काकाला आपल्या स्नेहबंधातून मुक्त केलं होतं.

आज नकुलही नाही आणि काकाही! पण लोक या दोघांची आठवण नेहमी काढतात. मीही माझ्या मुलांना नकुलच्या मायेच्या, कृतज्ञतेच्या, काकाला माणसात आणण्याच्या कथा सांगते, तेव्हा माझेही डोळे पाणावतात.

**

– सरोज चौगुले
प्लॉट नं. ५७, 'धनसरोज', रत्नाप्पा कुंभार नगर-२, कोल्हापूर 416013

। दिनविशेष... १ जुलै महाराष्ट्र राज्य कृषिदिन (कै. वसंतराव नाईक) जयंती दिन ।

प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

आपल्या आसपास...

रुपयाची कहाणी !

अरविंद परांजपे

मी आहे भारतीय रुपया! मी तसा तुमच्याजवळ असतो आणि तुम्हाला माझी मदत होत असतेच. कशी? अहो, तुम्हाला तुमचा खाऊ, खेळ, वह्या-पुस्तकं असं काहीही जरी घ्यायचं असेल तर ते माझ्या मदतीनेच होऊ शकतं. तुम्हालाच काय, आपल्या देशातील कोणालाही कुठलीही वस्तू हवी असेल किंवा एखादी सेवा घ्यायची असेल (उदा. प्रवास) तर माझ्यावाचून त्यांचे काम होत नाही. मी जेव्हा नव्हतो तेव्हा व्यवहार करायला लोकांना फार त्रासदायक होत असे. म्हणजे, उदाहरणार्थ कुणाला गहू हवे असतील तर त्याला त्याबदल्यात भाजी द्यायला लागे किंवा त्याच्याकडे काम करायला लागे. पण माझ्यामुळे सर्व व्यवहारांना एक समान परिमाण मिळालं. सर्वच वस्तूंचं आणि सेवांचं मूल्य माझ्यामुळे निश्चित केलं गेलं आणि त्यामुळे व्यवहार सुलभ आणि वेळ वाया न जाता होऊ लागले.

देशातल्या देशात होणाऱ्या व्यवहारांकरता मी म्हणजे भारतीय रुपया वापरल्यामुळे काही प्रश्न येत नाही. पण जर कोणाला परदेशातून काही वस्तू घ्यायची असेल किंवा भारतातून काही माल परदेशी पाठवायचा असेल तर त्याचे मूल्य निश्चित कसे करायचे? उदाहरणार्थ अमेरिकेत 'डॉलर' हे चलन वापरतात. जर आपण त्यांना कापूस निर्यात केला तर त्यासाठी त्यांच्याकडून किती मूल्य (रुपये) घ्यायचे? किंवा त्यांच्याकडून आयात करताना त्यांना एखाद्या वस्तूबद्दल किती मूल्य द्यायचे? हे कसं ठरवणार? त्यासाठी एक दर किंवा मूल्य निश्चित केले जाते. त्यांच्याकडचा डॉलर व मी यांच्यातील नातं म्हणजेच हा **विनिमय दर** (एक्सचेंज रेट). एकदा हा विनियम दर निश्चित झाला की त्यानंतर आयात-निर्यात करता येते. म्हणजे आपल्याकडून निर्यात केलेल्या कापसाकरता ते आपल्याला डॉलर देतात, ज्याचे आपण रुपयांत रूपांतर करतो आणि आपण जर त्यांच्याकडून संगणक घेतले तर आपण त्यांना रुपये देतो; ज्याचे डॉलरमध्ये रूपांतर होते. अशाच प्रकारचे व्यवहार जगातील सर्व देशांबरोबर त्या देशाच्या चलनात केले जातात.

उदा. ब्रिटन बरोबर ब्रिटीश पौंड, युरोपातील देशांबरोबर युरो तर चीनबरोबर युआंग. आंतरराष्ट्रीय व्यवहार सुरळीत चालावेत, त्यांना समान परिमाण मिळावे यासाठी मी आणि इतर देशातलं चलन यातला विनिमय दर नक्की करणे महत्त्वाचे ठरते.

मित्रांनो, एक लक्षात ठेवा की इतर देशातील चलनांबरोबरचा ठरवलेला हा दर कायम राहत नाही. तो रोजच्या रोज बदलत असतो. (कधी कमी कधी जास्त) सध्या माझ्या प्रकृतीची चर्चा सगळीकडे चालू आहे. माझ्या प्रकृतीची देखभालीची जबाबदारी देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे आहे. त्याचे संचालक मंडळ, तसेच केंद्रीय अर्थमंत्री, उद्योजक, आयात-निर्यात करणाऱ्या कंपन्या, परदेशी असणारे भारतीय, अर्थसंस्था असे सर्वच जण माझं मूल्य घसरत चाललंय म्हणून सध्या चिंतेत आहेत. अहो, १ वर्षापूर्वी १ अमेरिकन डॉलर म्हणजे ४८ रुपये असे होते तर सध्या त्याकरता तब्बल ५५ रुपये मोजायला लागतात. म्हणजे माझं मूल्यसाधाणपणे १५% एवढं कमी झालं. ज्याला **अवमूल्यन** म्हणतात. तसं बघायला गेलं तर आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यापासून अमेरिकन डॉलर किंवा बिटीश पौंड यांसारख्या परदेशी चलनाच्या तुलनेत माझं मूल्य बहुधा

माया नभाची दाटली उभ्या शिवारात न्यारी ।
ओल्या भिजल्या ढेकळा फुटे हिरवी खुमारी ॥



मागील १५ वर्षांत अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य कसे घसरत गेले आहे ते या आलेखात दाखवले आहे. १९९५ मध्ये १ डॉलरसाठी साधारण ३२ रुपये लागत होते. तर सध्या तब्बल ५६ रुपये १ डॉलरसाठी मोजावे लागतात. म्हणजे जवळजवळ ४३% अवमूल्यन झाले आहे.
(तक्त्यामध्ये दाखवलेल्या दराविषयी - १ डॉलर = ५५ रुपये; म्हणजेच रुपयाची डॉलरमध्ये किंमत १/५५ = ०.०१८०० इतकी येईल.)

कमी कमीच होत आलं आहे.

माझे मूल्य कमी होण्याची अनेक कारणे आहेत. माझ्या प्रकृतीवर अनेक घडामोडींचा परिणाम होत असतो. जसं तुम्ही किती सकस आहार घेता आणि व्यायाम करता त्यावरून तुमची तब्येत सुधारते; तसंच आपल्या देशातील केंद्र सरकारच्या धोरणांचा आणि परदेशातील घटनांचा परिणाम माझ्या प्रकृतीवर होत असतो. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे.

देशाच्या आयात-निर्यातीचे प्रमाण - जर देशाची आयात, त्याच्या निर्यातीपेक्षा जास्त असेल तर त्या देशाचे चलन अशक्त होते. आपला देश जरी ६० वर्षांपूर्वी स्वतंत्र झाला तरी अन्य देशांच्या तुलनेत आपल्याला जास्त प्रगती करता आलेली नाही. तंत्रज्ञान, भांडवल, संशोधन, आधुनिक उत्पादने याकरता आपल्याला परदेशांवर अवलंबून राहावे लागले आहे. कच्चे तेल (पेट्रोलियम उत्पादनांकरता), खते, डाळी, खाद्य तेल, कोळसा अशा अनेक वस्तू आपण आयात करतो. याकरता परकीय चलन आपल्याला द्यावे लागते. त्याशिवाय भारतीयांना सोन्याचे आकर्षण असल्याने त्याचीही भरपूर आयात केली जाते. या तुलनेत आपली निर्यात कमी असते. गेल्या काही वर्षांमध्ये आपण आपल्या माहिती-तंत्रज्ञानासारख्या (आयटी) सेवांची निर्यात करू लागलो आहोत. परंतु आयातीचे प्रमाण (खर्च होणारे परकीय चलन) निर्यातीपेक्षा (मिळणारे परकीय चलन) जास्त आहे. या दोन्हीच्या एकत्रित ताळेबंदाला **'बॅलन्स ऑफ पेमेंट'** म्हणतात. माझा दर मुख्यत्वे यावर अवलंबून असतो.

आपल्या देशाला आयात करण्याकरता खूप परकीय चलन लागते. याचा परिणाम म्हणून माझ्यावर सतत ताण असतो. तुम्हाला माहिती आहे की जगामध्ये 'मागणी-पुरवठा' या तत्त्वानुसार वस्तूंचे दर ठरतात. परकीय चलनाची मागणी (आयात जास्त असल्यामुळे) निर्यात करून मिळणाऱ्या परकीय चलनाच्या तुलनेत भागत नाही. त्यामुळे परकीय चलनाच्या तुलनेत माझं मूल्य घसरतंय. 'बॅलन्स ऑफ पेमेंट'चे दोन भाग असतात. १) चालू खाते (करंट अकौंट) ज्यात वस्तू-माल-सेवा यांच्यातील व्यवहार येतो. आणि २) भांडवली खाते - (कॅपिटल अकौंट) ज्यात परदेशातून भांडवली स्वरूपात जे परकी चलन येतं त्याचा समावेश होतो.

सध्याच्या काळात चालू खात्यावरची तूट (करंट अकौंट डेफिसिट) ही आपल्या देशाच्या एकूण उत्पन्नाच्या (जीडीपीच्या) तुलनेत ४% एवढी जास्त आहे. जी २% एवढीच असणे अपेक्षित आहे. त्यामुळे माझ्या किंमतीत घसरण होत चालली आहे. सुदैवाने भांडवली खात्यावर आपल्या देशात परकीय चलन जास्त येत असल्यामुळे चिंतेचं कारण नाही. भांडवली खात्यात परदेशातून भारतातल्या कंपन्यात होणारी थेट

। अभिनंदन... ज्येष्ठ कथालेखिका नीरजा - जी.ए. कथाकार पुरस्कार ।
प्रायोजक – श्री. गौरव सहस्रबुद्धे, डोंबिवली

विचार करा आणि उत्तरं कळवा

* रुपयाची घसरण आणि महागाई यांचा काही संबंध असतो का?
* सोन्याची खरेदी कमी केली तर रुपयाचे मूल्य वाढेल का?
* आंतरराष्ट्रीय व्यापार आणि रुपयाचे मूल्य यांचा कसा संबंध असतो?

गुंतवणूक (एफ.डी.आय.), परदेशी अर्थ संस्थांनी भारतीय भांडवल बाजारात केलेली गुंतवणूक (एफ आय आय), अनिवासी भारतीयांनी पाठवलेला पैसा आणि परदेशातून घेतलेले कर्जरोखे यांचा समावेश असतो. आपल्या देशाचा विकासदर अमेरिका किंवा युरोपपेक्षा जास्त असल्याने व भारतातील मोठी बाजारपेठ परदेशी कंपन्यांना आकर्षित करत असल्याने परदेशी भांडवलाचा ओघ चालू राहील.

१९९१ मध्ये आपल्या देशावर आर्थिक संकट आले होते. त्यावेळी आपल्याकडे फक्त काही आठवडे आयात करता येईल एवढाच परकीय चलनाचा साठा (रिझर्व्ह) होता. त्यावेळी तर आपल्याला देशातील सोने गहाण ठेवून कर्ज उभारण्याची वेळ आली होती. त्यानंतर आर्थिक सुधारणा करून व धोरणे बदलून आपण विकासदर साधारण ५% वरून ९% पर्यंत नेला होता. परंतु गेल्या वर्षभरात हा दर ६% एवढा खाली आला आहे. पुन्हा एकदा आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबवून देशाचा विकासदर वाढवला नाही तर माझ्या प्रकृतीत सुधारणा होणार नाही. परकीय चलन राखीव निधी १९९१ मध्ये फक्त ६०० कोटी डॉलर होता, तो आता सुमारे ३०,००० कोटी डॉलर एवढा झाला आहे.

तसं बघायला गेलं तर माझे अवमूल्यन झाले तर निर्यात करणाऱ्यांना फायदा होतो. कारण त्यांना प्रति डॉलर जास्त रुपये मिळतात; त्यामुळे ते खूष होतात. तर आयात करणारे चिंताग्रस्त होतात. कारण त्यांना प्रति डॉलर जास्त रुपये खर्च करावे लागतात. गेल्या काही वर्षांतील जागतिक मंदी सदृश्य परिस्थितीचाही परिणाम माझ्यावर थोडा झाला असला तरीही देशांतर्गत परिस्थितीच माझ्या अवमूल्यनाला कारणीभूत आहे. पेट्रोलियम पदार्थ, खते यांच्यावरच्या अनुदानामुळे केंद्रसरकारची महसूली तूट - (केंद्रसरकारच्या उत्पन्न आणि खर्चातील फरक; ज्याचे प्रमाण चिंताजनक आहे.) वाढत चालली आहे. माझी प्रकृती सुधारण्याचे उपाय जर केंद्र सरकारने केले तर पुन्हा एकदा माझा दर डॉलरच्या तुलनेत वधारेल आणि देशातील अर्थव्यवस्था स्थिर होऊन प्रगतिपथावर जाईल.

**

– अरविंद परांजपे
२, गीता सहनिवास, ५/१० एरंडवणे, पुणे 411004
aspa@vsnl.com

* श्रद्धांजली *



छात्र प्रबोधनच्या सुरुवातीपासूनच्या लेखक परिवारातले मान्यवर ज्येष्ठ कवी **श्री. दत्ता हलसगीकर** यांचं नुकतंच (दि. ९ जून २०१२) निधन झालं.

'ज्यांची बाग फुलून आली, त्यांनी दोन फुले द्यावीत' असे सहजसुंदर काव्य रचणाऱ्या कै. दत्ता हलसगीकरांच्या जीवनाला लाभलेली आंतरिक श्रीमंती, त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. सामान्य वाचकाच्या मनातील निराशा ती दूर करते, मरगळलेल्या मनांना मूल्यांचे जीवनदान देते, दु:खितांविषयी मनात कळवळा जागा करते. प्रत्येकाने मनात जपून ठेवावेत, आचरणात आणावेत असे अनेक अनमोल विचार दत्ताजी आपल्या कवितेतून देऊन जातात.

'छात्र प्रबोधन'च्या नवनवीन उपक्रमांना, प्रयोगांना कधी पत्रातून तर कधी प्रत्यक्ष भेटून पाठिंबा देणारे, आशीर्वाद देणारे दत्ताजी आज आपल्यात नाहीत. छात्र प्रबोधनवर निरलस प्रेम करणाऱ्या दत्ताजींना भावपूर्ण श्रद्धांजली.

(दत्ताजींच्या *'आशावादाची फुले वाटणारा कवी'* हा त्यांच्या काव्याबद्दलचा शैलजा देशमुख यांचा लेख छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळावर जरूर वाचा.)

**धरण बांधणारे हात असतात पवित्र ।
लिहितात ते हिरव्या ओळींचे सूत्र ।।**

आभाळच आले हातांमध्ये

पावसाचे थेंब। पानांवर मोती
दिव्य चमकती। किरणांत।।

पावसाचे थेंब। सोबती गारा
ओला गार वारा। कोरा कोरा।।

पावसाचे थेंब। बिल्लोरी टपोरे
झेलतात पोरे। अंगणात।।

पावसाचे थेंब। मातीत लपून
हिरवे होऊन। अंकुरती।।

पावसाचे थेंब। खिडकीत येती
आणि शहारती। स्वप्ने माझी।।

पावसाचे थेंब। पागोळ्यांमधून
येती नादावून। खेळायला।।

पावसाचे थेंब। जलतरंगाचे
संगीतच नाचे। नभांगणी।।

पावसाचे थेंब। ओंजळी झेलले
आभाळच आले। हातांमध्ये...।।

– **आश्लेषा महाजन,** मंजिरी', २३० चित्ररेखा सोसा., सहकारनगर – १, पुणे 411009
ashleshamahajan@rediffmail.com

। जरुर शोधा - http://www.how-to-draw-funny-cartoons.com/cool-textures.html
(गमतीदार व्यंगचित्रे काढायला शिका)।

प्रायोजक – श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे

॥उजळती वाट॥

लेखांक – ८

निरोप घेताना

– डॉ. स्वर्णलता भिशीकर

प्रिय चारुहास,

गेले सात महिने मी तुला विद्याव्रत संस्काराविषयी नियमित पत्र लिहीत आहे. तू सुद्धा तुझे प्रश्न, शंका मला कधी दूरभाषवर तर कधी पत्रातून विचारत होतास. आता आपल्यातला विद्याव्रत संस्काराविषयीचा संवाद या पत्राने आपण पूर्ण करत आहोत. यानंतरही आपल्या जिव्हाळ्याच्या वेगवेगळ्या विषयांवर आपण बोलत राहूच.

युक्ताहारविहार या व्रतापासून इंद्रियसंयमन, दैनंदिन उपासना, सद्‌गुरू सेवा, स्वाध्याय प्रवचन आणि राष्ट्रअर्चना ही सहा व्रतं सहा पत्रांमधून आपण समजून घेतली. ही सारी विद्याव्रत संस्कार स्वीकारण्याची पूर्वतयारी होती. या सगळ्या व्रतांचं पालन एकदम शंभर टक्के कोणाला जमत नाही. पण त्यांची आठवण जर नेहमी मनात जागी असली, तर हळूहळू त्यांचं आचरण आपल्याला जमायला लागतं, हे ही तुला आता कळलं असेल.

शाळेत विद्याव्रत घेतलेला आपला एक विद्यार्थी मुंबईच्या एका वैद्यकीय महाविद्यालयात शिकायला गेला. तिथले त्याचे मित्र म्हणायला लागले, 'सिगरेट ओढल्यानं काय बिघडत असतं? थोडी दारूची चव का नाही घेऊन पाहात?' या विद्यार्थ्याने विद्याव्रत घेताना सर्व व्यसनांपासून दूर राहाण्याचा निश्चय केला होता. त्या निश्चयाने त्याला बळ दिलं. सगळे मित्र आग्रह करत असूनही तो सिगरेट आणि दारूपासून दूर राहिला. सुरुवातीला टिंगल टवाळी करणारे मित्र नंतर त्याचा आदर करू लागले. आपले कुठलेही विचार, आचार विद्याव्रतामुळे अधिकाधिक अर्थपूर्ण होत असतात.

विद्याव्रत संस्कार आपल्या आयुष्याची दिशा, हेतू आपल्याला सांगत असतो, चारू. आपल्या शक्तिबुद्धीचा चांगला विकास करायचा आणि तो समाजाच्या, देशाच्या कारणी लावायचा; सगळ्या जगात भरून राहिलेली जी परब्रह्मशक्ती तिचा अनुभव घ्यायचा हे आपल्या जीवनाचं ध्येय आहे. चारू, कोणी विज्ञानाच्या अभ्यासातून, कोणी कलांच्या अभ्यासातून, तर कोणी आणखी कुठल्या माध्यमातून आपल्या आयुष्यातल्या ध्येयाचा शोध घेऊ शकतो. असा ध्येयाचा शोध घेणारे युवक-युवती हे आपल्या घराचा, आपल्या समाजाचा, आपल्या देशाचा मोठा आधार बनतात.

विद्याव्रत सर्वांसाठी

पूर्वी विद्याव्रत संस्कार फक्त मुलांसाठी केला जात असे. पण विद्येचा अभ्यास तर मुलींना देखील सारखाच करावा लागतो. शिवाय सगळ्याच जातींच्या आणि धर्मांच्या मुलामुलींना विद्याव्रत संस्कार आपण देतो. सगळ्यांसाठीच हा संस्कार दिशादर्शक, आत्मिक बळ देणारा म्हणून आवश्यकही मानतो.

या संस्कारात विद्याव्रताचं प्रतीकरूप चिन्ह घेण्याचा रिवाज आहे. विद्याव्रताचं हे चिन्ह मात्र ज्याच्या त्याच्या श्रद्धेप्रमाणे जो-तो घेऊ शकतो. आपल्या गळ्यात असलेलं हे चिन्ह आपण अंगीकारलेल्या संस्काराची सतत आपल्याला आठवण करून देत असतं. आपले सगळे संकल्प निश्चयपूर्वक पूर्ण करण्यासाठी बळ देत असतं.

आपण जसा आता पत्ररूपी संवाद साधला तसा विद्याव्रतामधील सहा उपव्रतांविषयी आपण सगळ्या मुलांशी शिबिरांमधून, व्याख्यानांमधून संवाद साधत असतो. या व्रतांची त्यांना ओळख करून देत असतो. त्यासंबंधी प्रश्नोतरं, चर्चा-शंका-समाधान असं याचं स्वरूप असतं.

विद्याव्रतालाच पूर्वी ब्रह्मचर्यव्रत असं म्हणत असत. पूर्वी आपल्याकडे ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम अशा चार आश्रमांची

चुकवून चकव्यांना जो जाई पुढे पुढेच ।
त्याच्यापासून यश का राहील दूर थोडेच?

मांडणी केलेली होती. त्यातल्या ब्रह्मचर्याश्रमात विद्येचा अभ्यास करायचा अशी मांडणी होती. याच काळात शरीर सुदृढ करायचं, मन पवित्र आणि शक्तिशाली करायचं. कारण शरीर, मन ही विद्या मिळवण्याची साधनं आहेत.

अग्निसाक्ष संस्कार

आपली भारतीय संस्कृती संस्कारांना महत्त्व देणारी आहे, चारू. विद्याव्रत हा सुद्धा एक संस्कार आहे. या संस्कारात वडिलधाऱ्या व्यक्तींचे आशीर्वाद, उचित श्लोक / मंत्रांचे पठण आणि अग्नी या तीन गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपण जी सहा व्रतं पाहिली, त्यांचा उच्चार घरातल्या वडिलधाऱ्या माणसांच्या आणि गुरुजनांच्या साक्षीने संस्काराच्या वेळी तुम्ही करत असता. हे व्रत स्वीकारल्याचे चिन्ह म्हणून गळ्यामध्ये गोफात गुंफलेला ॐ घालत असता. काही काही जण ताईत किंवा क्रॉस किंवा बुद्धप्रतिमाही घालतात. अग्नी म्हणजे पवित्रतेचं, तेजस्वितेचं प्रतीक आहे. म्हणून हा विद्याव्रत संस्कारही त्याच्या साक्षीने होतो.

तुझा विद्याव्रत संस्कार

ज्या दिवशी तुझा विद्याव्रत संस्कार असेल, त्या दिवशी तू आनंदी मनाने सकाळी उठशील. स्नान करून घरातल्या देवाला नमस्कार करशील आणि आईवडील, नातेवाईकांच्यासह जिथे तुझा विद्याव्रत संस्कार असेल, त्या ठिकाणी प्रसन्न चित्ताने येशील. ते स्थळसुद्धा अगदी निर्मळ आणि सुशोभित केलेलं असेल. व्यासपीठावर यज्ञवेदी (यज्ञकुंड) असेल. तिथे तुझे शिक्षक किंवा आचार्य बसलेले असतील. तुझ्या आईवडिलांनाही आदराने बसवलं जाईल. अध्वर्यू म्हणजे उपासना सांगणारे आचार्य आपल्या जागी शांतपणे बसलेले असतील. तंबोऱ्याचा मंद झंकार चाललेला असेल. सर्वांच्या मस्तकी केशरी तिलक शोभत असतील. तू आणि तुझे विद्याव्रत घेऊ इच्छिणारे मित्र मध्यभागी एकत्र बसलेले असाल. बाकी सर्वजण तुमच्या भोवताली बसलेले असतील. तुमचे आईवडील उठून उभे राहून व्यासपीठावरील आचार्यांना विनंती करतील की आमच्या मुलांना विद्याव्रताचे यमनियम समजावून सांगा आणि त्यांना विद्याव्रताची दीक्षा द्या. आचार्य ‘तथास्तु’ म्हणतील. मग गेले काही महिने आपण ज्या व्रतांविषयी बोलतो आहोत, त्या व्रतांचा अर्थ ऋषींच्या आणि संतांच्या शब्दांमधून आपल्यापुढे उलगडू लागेल. गीताईमाऊली आपल्याला **युक्ताहारविहार** आणि **इंद्रिय संयमन** यांचा अर्थ सांगेल -

‘निजणे जागणे खाणे, फिरणे आणि कार्यही
मोजूनि करितो त्यास, योग हा दुःखनाशक ।।
काम हा आणि हा क्रोध धाडिला जो रजोगुणे
मोठा खादाड पापिष्ट तो वैरी जाण तू इथे ।।’

(गीताई सांगते आहे, *सर्व गोष्टींमध्ये समतोल असू देत. मला हे हवं, मला ते हवं, असं सारखं म्हणू नको. हा राग मोठा वाईट असतो. त्याच्या आहारी जाऊ नको.)*

मग तुम्ही **दैनंदिन उपासनेचा** आणि **सद्गुरुसेवेचा** संकल्प कराल. भगवान रामचंद्र आणि भगवान श्रीकृष्ण गुरुगृही राहिले होते. याची तुम्ही आठवण कराल. आणि आपणही गुरूंच्या जवळ राहू असा संकल्प कराल. उत्तम अभ्यास, उत्तम चिंतन आणि उत्तम प्रकटन हे सर्व काही तुम्ही शिकणार आहात. **स्वाध्याय प्रवचनाचं** व्रत अशाप्रकारे तुम्ही अंगीकारणार आहात. नुकतंच फुललेलं, न हाताळलेलं फूल जसं देवाच्या पायी अर्पण करतात, तसं तुम्ही तुमचं टवटवीत जीवन देवाच्या आणि देशाच्या चरणी अर्पण करण्याचा संकल्प करणार आहात.

‘काया ही पंढरी, आत्मा हा विठ्ठल’ असं म्हणत स्वतःमधला आणि इतरांमधला देव ओळखण्याचा संकल्प करणार आहात.

माझ्या डोळ्यांसमोर

चारू, किती भाग्यवान तुम्ही! असा पवित्र संस्कार करणारे शिक्षक आणि आईवडील तुम्हाला लाभले आहेत. आता माझ्या डोळ्यांसमोर तुझी लोभसवाणी बालमूर्ती दिसत आाहे. वेदीमध्ये प्रज्वलित झालेल्या अग्नीच्या ज्वालांचा प्रकाश तुझ्या चेहऱ्यावर परावर्तित झाल्याने तुझा हसतमुख चेहरा अधिकच उजळ दिसत

। जरूर ऐका... शुभंकरोति कल्याणम् - गीत गंगाधर महांबरे - गायिका माणिक वर्मा।

प्रायोजक – श्री. अजित परांजपे, पुणे

'उजळती वाट' म्हणजेच विद्याव्रत संस्कारात सांगितलेल्या ६ व्रतांविषयीची ही लेखमाला आता संपते आहे. मात्र आत्तापर्यंत या व्रतांबद्दल वाचलेलं, ऐकलेलं जरूर पुन्हा पुन्हा वाचा. त्याचा अर्थ समजावून घ्या. त्याप्रमाणे वागायचा निश्चयपूर्वक, सातत्याने प्रयत्न करा. ही व्रतं रोजच्या दिनक्रमात आचरणात आणताना तुम्हाला ज्या अडचणी येतील, काही शंका निर्माण होतील त्याबाबत मोकळपणाने विचारा. त्यांना उत्तरं द्यायला आम्हाला निश्चितच आवडेल.

आहे. तुझ्यासमोर तबकात फुलं आणि अक्षता आहेत. त्या तू पवित्र अग्नीला अर्पण करत आहेस. आता तू आणि तुझ्या मित्रांनी हातात यज्ञोपवित (व्रतचिन्ह) धरलं आहे. पूर्वेला म्हणजे सूर्याच्या दिशेला तोंड करून तुम्ही सर्व उभे राहिला आहात. तुम्ही म्हणत आहात,

यज्ञोपवीतं परमं पवित्रं, प्रजापतेर्यत् सहजं पुरस्तात्।
आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं, यज्ञोपवीतम् बलमस्तु तेजः।
विद्याव्रताचे मज चिन्ह प्राप्त
करो मला ते बलतेज युक्त।
आरोग्य देवो शुभबुद्धि देवो
यशवंत आयुष्य मजलागि देवो ।।

सूर्य हा आपला मित्र आहे. आपण आणि आपले मित्र सूर्यासारखे तेजस्वी व्हावेत, म्हणून पूर्वेकडे वळून तुम्ही विद्याव्रत चिन्ह हातात धरलं आहे. आता ते तुम्ही पाण्याने भिजवत आहात. म्हणजे श्रद्धाभक्तीने ओलं करून ते तुम्ही तुमच्या गळ्यात घालता आहात. आता तुम्ही गायत्रीमंत्राची संथा घ्यायला सिद्ध झाला आहात. तुमच्या चिमुकल्या मूर्ती विराट विश्वाला दृष्टीपुढे आणत आहेत. पृथ्वी, अंतरिक्ष, सूर्य, आकाशगंगा, अनंत आकाशगंगा आणि ज्याच्यामुळे हे सारं विश्व चालतं, तो तेजाचा गाभा - सविता (सूर्य) त्याची प्रार्थना करीत आहात. तुमच्या बुद्धीला त्याने प्रचोदना म्हणजे प्रेरणा द्यावी, असं त्याला सांगत आहात. बाल हनुमंताने सूर्यबिंबाला स्पर्श करायला अवकाशात झेप घ्यावी, तसं हे तुमचं विद्याभ्यासासाठीचं उड्डाण आहे.

'अणुरणी या थोकडा, तुका आकाशाएवढा' लहानगा तुका आकाशाएवढा झाला. तसे तुम्ही आकाशाएवढे होत आहात; गायत्रीमंत्राची उपासना करताना! या तुमच्या उड्डाणासाठी, उत्तुंग अशा भरारीसाठी आमचं खूप खूप शुभचिंतन आहे.

'प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया
समर्थ मायभूमिला जगी करावया'

तुम्ही सारे समर्थ, शक्तिशाली, तेजस्वी होण्यासाठी प्रबोधिनीत आलात. आता जगाच्या पाठीवर कुठेही असलात, तरी समर्थ होण्याचं आणि मायभूमीला समर्थ करण्याचं व्रत **(राष्ट्रअर्चना)** तुम्ही सोडणार नाही. आपली मायभूमी जगाच्या पटावर विश्वगुरू म्हणून शोभली पाहिजे. सामर्थ्याने तळपली पाहिजे. त्यासाठी तुम्ही आपलं कर्तृत्व पणाला लावायचं आहे. दुष्टांना शासन करणं आणि चांगल्या लोकांचं संरक्षण करणं हा या मायभूमीच्या सुपुत्रांचा आणि सुकन्यांचा धर्म आहे. या धर्माची पताका तुम्ही सदैव उंच ठेवाल असा आम्हाला विश्वास आहे. या वाटेवरून चालताना आमच्या प्रेमाची शिदोरी तुमच्याबरोबर नेहमीच असेल. तुमच्या गुरूंनी तुम्हाला जे सांगितलं आहे आणि भोवतालची परिस्थिती पाहून तुम्हाला जे कळलं आहे, त्या दोन्हींच्या प्रकाशात तुमची वाट उजळणार आहे.

निरोप

प्रिय चारुहास, विद्याव्रताबद्दलचा पत्रसंवाद आपण सुरू केला, त्या पहिल्या पत्राच्या शेवटी तुला ज्या शुभेच्छा दिल्या होत्या, त्याच आता देत आहे. सहा व्रतांच्या प्रकाशात वाटचाल करत असताना माझ्या छोट्या मित्रा, तूच एक तेजस्वी दिवा हो... इतरांना प्रकाश देणारा, वाट दाखवणारा! आम्हा सर्वांचे शुभाशीर्वाद मी तुझ्यापर्यंत पोहोचवीत आहे.

तुझी लताताई

**

– स्वर्णलता भिशीकर
ज्ञान प्रबोधिनी, हराळी, डाक तोरंबा, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद

संस्काराने लाभे व्यक्तिमत्त्वाला मोल।
आहे अनमोल आयुष्य हे ।।

तुमचा आवडता 'छात्र प्रबोधन' २० वर्षांचा !!

काय, खरं वाटत नाही म्हणता? पण हे खरंय. तुमचं-आमचं आवडतं 'छात्र प्रबोधन' मासिक या वर्षी २० वर्ष पूर्ण करत आहे आणि म्हणूनच या द्विदशकपूर्ती वर्षाच्या निमित्ताने तुमच्या मनातली 'छात्र प्रबोधन'ची प्रतिमा जाणून घ्यायची खूप इच्छा आहे. छात्र प्रबोधन मासिकाबद्दलच्या **तुमच्या, तुमच्या घरातल्यांच्या, शिक्षकांच्या भावना काय आहेत, मतं काय आहेत,** जाणून घ्यायला आम्ही उत्सुक आहोत. **'माझ्या नजरेतून छात्र प्रबोधन'** अर्थात छात्र प्रबोधनविषयीच्या तुमच्या प्रतिक्रिया, तुमच्या अपेक्षा, त्यातलं काय भावलं, काय जपून ठेवलं, काय वापरून पाहिलं, काय उपयोगी पडलं असं जरूर लिहून पाठवा; खास तुमच्या शैलीत आणि मनापासून जे वाटतंय ते! तुमच्या प्रतिक्रियांद्वारा तुमचं 'छात्र प्रबोधन' वरचं प्रेम जरूर व्यक्त करा. या तुमच्या प्रतिक्रियांचं संकलन 'छात्र प्रबोधन'च्या आगामी वाटचालीसाठी बळ देईल यात शंका नाही. काही निवडक प्रतिक्रियांना 'छात्र प्रबोधन'च्या अंकातून, प्रदर्शनीतून प्रसिद्धीही दिली जाईल.

'अनेकांच्या नजरेतून छात्र प्रबोधन' पुढच्या म्हणजे सौर श्रावणच्या अंकापासून नियमित वाचा.

...वाचाल तर वाचाल...

पुस्तक आपुला सखा

पुस्तकात काय असते? मीच विचारतो, 'सांगा काय नसतं?'

जे सूर्याला न दिसतं
ते पुस्तकात असतं
म्हणूनच पुस्तकाचे अन् आपलं
दोस्तीचं नाते असतं.

नदीचं झुळझुळ वाहणं
कोकिळेचं कुहुकुहु गाणं
बालकाचं धाडस, बालिकेचं साहस
सगळं सगळं पुस्तकात असतं.

विज्ञानाची जादू, जादूची किमया
आईची माया, देवाची छाया
इकडचे, तिकडचे, परग्रहावरचे
कालचे, आजचे अन् उद्याचे
सगळं सगळं पुस्तकाला दिसतं.

संतांच्या बोधकथा
उपेक्षितांच्या, वंचितांच्या व्यथा
भूकंपाच्या, महापूराच्या कथा
डोळे तुमचे ओले करतात.

पुस्तकाच्या पानाची चव
वेगवेगळी असते.
नवरसाच्या स्रोताने
पुस्तक चिंब भिजलेले असतं.

पुस्तकात असं,
खूप काही असतं
म्हणूनच पुस्तकाचं अन् आपलं
दोस्तीचं नातं असतं.

– **दत्ता टोळ,** सोहम्, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल समोर, एरंडवन, पुणे – ४

। दिनविशेष... १ ते ७ जुलै राष्ट्रीय पाणलोट सप्ताह ।

प्रायोजक – श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, डोंबिवली

चित्रगोष्टी ६

चित्रा वैद्य

निसर्गचित्र - १

निसर्ग हा एक चमत्कार आहे. निसर्गातील रंग, आकार, पोत, आवाज, वातावरणातील बदल अशा अनेक गोष्टींमधून आपल्याला खूप काही शिकायला मिळते. जितके निरीक्षण करावे तितक्या नवीन गोष्टी आपल्याला जाणवतात.

तुम्हाला माहीत आहे का की कुठलीही कलानिर्मिती ही निसर्गातून स्फूर्ती मिळाल्यावरच होत असते. गायक, वादक, नर्तक, चित्रकार, शिल्पकार, कवी सर्वांनाच निसर्गातून स्फूर्ती मिळत असते. सर्व काही निसर्गच तर देत असतो.

महत्त्वाची गोष्ट अशी की कुठलीही कला शिकताना निसर्ग-निरीक्षणाची दृष्टी आपल्याकडे हवी. केवळ परीक्षेपुरता एखादया कलेचा विचार न करता एकूणच आपली सौंदर्यदृष्टी/अभिरुची वाढवणे महत्त्वाचे असते. कुठल्याही कलेच्या संदर्भात ही पहिली पायरी आहे. मग नंतरचा टप्पा भरपूर सरावाचा येतो. आळस/कंटाळा न करता नेटाने सराव करत राहणे महत्त्वाचे.

एखादया नैसर्गिक वस्तूचे निरीक्षण आणि हुबेहूब चित्रण करण्याच्या क्षमतेचा विकास करणे हे ग्रेड परीक्षेतील निसर्गचित्र या विषयाचे उद्दिष्ट असते. निसर्गचित्रासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्रपणे फूल व पाने असलेली डहाळी देण्यात येते. सर्वसाधारण ज्या भागात जी फुले मुबलक प्रमाणात मिळतात किंवा परीक्षेच्या वेळी ज्या फुलांचा हंगाम असतो त्या त्या जातींची फुले त्या भागाच्या परीक्षा केंद्रात दिली जातात. त्यामुळे सर्व परीक्षा केंद्रांवर एकाच प्रकारची फुले न मिळता प्रत्येक केंद्रावर ती वेगळी असू शकतात.

सामान्यत: सूर्यफूल, ॲस्टर, झिनीया, सदाफुली, जास्वंद, कण्हेरी यांसारख्या सर्व ठिकाणी मिळणाऱ्या फुलांचा परीक्षेसाठी उपयोग करतात.

परीक्षेत जी फुले चित्रित करायला दिली जातात त्या व्यतिरिक्त पुष्कळ फुला-पानांचा अभ्यास करायला हवा. अगदी सर्वप्रथम करायची गोष्ट म्हणजे पेन, पेन्सिल व स्केचबुक घ्यायचं आणि आपल्या परिसरातील पानं, फुलं, वनस्पती यांचं शीघ्र चित्रण तसंच तपशीलवार चित्रण करायचं. वेगवेगळ्या आकाराची पाने, त्यातल्या शिरा, देठ, जोड, फुले, पाकळ्यांचा आकार, त्यावरील चुण्या, मध्यभागावरील परागकणांचे ठिपके, इ. अनेक गोष्टींचे हुबेहुब चित्रण काढायचा सरावा करावा. सराव झाल्यावर त्यात गंमत वाटू लागते. आतापर्यंत अनेक चित्रकारांनी विविध प्रकारे फुलांचे चित्रण केले आहे, त्याचा अभ्यास करावा.

परीक्षेच्या वेळी मिळालेल्या फुलाची डहाळी वेगवेगळ्या कोनात फिरवून त्याचे वेगवेगळ्या कोनांतून पहिल्यांदा निरीक्षण करावे. जो कोन आकर्षक दिसत असेल तो रेखाटनासाठी निश्चित करावा.

एलिमेंटरी परीक्षेत फुलाची डहाळी व तिच्या कोणत्याही एका भागाचे विस्तारीत रेखाटन करायचे असते. तर इंटरमिजिएटसाठी फुलाची डहाळी, तिच्या कोणत्याही दोन भागांचे विस्तारीत रेखाटन व एक अलंकारिक आकार काढायचा असतो. त्याप्रमाणे कागदावर डहाळी व इतर रेखांकनाची जागा निश्चित करावी. यानंतर त्याचे तपशीलवार फिके रेखाटन करावे. एलिमेंटरीच्या परीक्षेचा कालावधी २ तास तर

ज्ञानाची शिदोरी सरते ना कधी।
पेरते व्हा आधी जागोजागी ।।



इंटरमिजिएटला ३ तास असतो. त्याप्रमाणे वेळेचे विभाजन करून चित्र पूर्ण करावे.

पारदर्शक किंवा अपारदर्शक जलरंग अशा दोन्हीपैकी कुठल्याही एका माध्यमात तुम्ही निसर्गचित्र रंगवू शकता. परंतु क्रेयॉन्स, ऑइल पेस्टल अथवा रंगीत पेन्सीलीने केलेले रंगकाम परीक्षेत विचारात घेतले जात नाही.

पाकळ्या रंगवताना एक एक पाकळी तपशीलवार रंगवावी. पाकळीची प्रकाशित बाजू फिक्या रंगाने व गडद बाजू गडद रंगाने रंगवावी. दोन्ही छटा एकमेकीत मिसळून शेडिंग करावे. एका पाकळीची सावली दुसऱ्या पाकळीवर पडलेली दिसेल. तीही गडद करावी. सूर्यफूल, ॲस्टर, जास्वंद अशी फुले निरखून पाहिल्यास त्यांच्या पाकळ्यांवर सुरकुत्या पडलेल्या दिसतात. त्याही थोड्या गडद रंगाने बारीक रेषेने दाखवाव्यात. फुलाच्या मधील भागाचे निरीक्षण केल्यावर त्यात अनेक रंग व बारीक ठिपके दिसून येतात. हा भाग रंगवताना प्रथम मुख्य रंगाचा वॉश देऊन तो वाळल्यावर गडद रंगाने ठिपके काढावेत. फांदी रंगवताना त्यावरही छायाप्रकाश दाखवावा. नैसर्गिक हिरवा रंग बनवण्यासाठी रंगपेटीतील फिकट हिरव्या किंवा गडद हिरव्या रंगामध्ये थोडासा लाल अथवा पिवळा ऑकर मिसळावा. ऑलीव्हग्रीन रंग डायरेक्ट वापरला तरी चालतो. गडद छटा बनवण्यासाठी काळा रंग न वापरता त्यासाठी निळा रंग वापरावा. प्रत्येक फुलाप्रमाणे पानाच्या आकारात, रंगात फरक असतो. काही पाने पोपटी, तर काही गडद हिरवी, काही तांबूस, तर वाळलेली पाने पिवळी दिसतात. बऱ्याच वेळा डहाळीवरील पाने कोमेजलेली, कुरतडलेली अथवा काळपट डाग असलेली असतात. अशा वेळी तशा रंगाची छटा तयार करून नैसर्गिक बारकाव्यांसकट तपशीलवार काम करावे.

पारदर्शक रंग वापरताना रंग फिका करण्यासाठी पाणी घालावे तर अपारदर्शक रंग वापरताना रंग फिका करण्यासाठी पांढऱ्या रंगाचा वापर करावा. फुलाचे रंगकाम पूर्ण झाल्यावर डहाळीच्या भागांचे उदा. पाकळ्या, फुलाचा मधला भाग, पान, सांधे इ. चे मोठ्या आकारात पेन्सीलने रेखाटन करणे आवश्यक असते. हे रेखाटन स्पष्ट, लयबद्ध व ओघवते असावे. यासाठी स्केचिंगचा सराव असणे आवश्यक असते. इंटरमिजिएट साठी फुलाचा अलंकारिक आकार काढायचा असतो. फुलांचे अलंकारिक आकार आपल्याला पुष्कळ ठिकाणी बघायला मिळतात. फुलाफुलांच्या कापडावर, चादरीवर, साडीवर, पडद्यावर, भिंतीवरील टाइल्सवर, देवळातील कोरीव कामात... आपल्याला निरीक्षणाची सवय असेल तर त्याचा खूप फायदा होतो.

**

– चित्रा वैद्य
ए-३/ श्रीकुंज सोसायटी, हनुमान मार्ग,
विलेपार्ले (पू.), मुंबई – ५७
info@artist-chitra.com / www.artist-chitra.com

(अधिक निसर्गचित्रे मुखपृष्ठाच्या आतील पानावर. तसेच रंगीत छायाचित्रांसाठी छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळाला जरूर भेट द्या.)

* कौतुक *

सौर वैशाख अंकात (मे २०१२) स्लाइड शो तयार करण्याच्या अभिनव स्पर्धेविषयी निवेदन प्रसिद्ध झाले होते. या स्पर्धेला आतापर्यंत २ स्पर्धकांनी स्लाइड शो तयार करून पाठवले आहेत. त्यांचे मनापासून कौतुक!

१. **चि. अनिकेत नातू,** डोंबिवली
२. **कु. अंकिता आपटे,** बेळगाव

। अभिनंदन... ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर - जीवनसाधना गौरव पुरस्कार (पुणे विद्यापीठातर्फे)

।प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे ☎ ९४२२०१७१७५

लंडन कॉलिंग

सुरेंद्र पाटसकर

लंडनमध्ये २७ जुलै रोजी तिसाव्या ऑलिंपिक स्पर्धेचे उद्‌घाटन झाल्यानंतर जगभरातील सुमारे साडेदहा हजारांहून अधिक खेळाडू 'सायट्स, अल्टीअस आणि मोर्टिअसम (अधिक वेगवान, अधिक उंच आणि अधिक बलिष्ठ) या ऑलिंपिकच्या ब्रीदवाक्याचेच प्रदर्शन जणूकाही संपूर्ण जगासमोर करतील. खेळाडू हवेबरोबर स्पर्धा करत जुने विक्रम मोडून नवे निर्माण करतील; आपल्या ताकदीचे, सामर्थ्याचे त्याचबरोबर संयमाचे, कौशल्याचे प्रदर्शन जगासमोर करतील. दिमाखदार उद्‌घाटन, त्याचे जगभरात प्रक्षेपण, स्पर्धेसाठी येणारे प्रेक्षक, पर्यटक, आर्थिक उलाढाल या मैदानाबाहेरील गाष्टींचेही नवे विक्रम होतील.

लंडनला तिसऱ्यांदा मान

आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीचे सदस्य असलेल्या सुमारे २०० देशांतील एका शहराची ऑलिंपिक स्पर्धेच्या यजमानपदी निवड केली जाते. सुमारे सात वर्षे आधीच ही निवड होते. ही निवड प्रक्रिया सुमारे दोन वर्षे चालते.

पहिल्या टप्प्यात यजमानपदाचा मान मिळविण्यासाठी काही शहरे अर्ज दाखल करतात. दहा महिन्यांनी समितीची कार्यकारिणी त्या शहराच्या स्पर्धा आयोजित करण्याच्या तयारीच्या आधारावर शर्यतीतील शहरांची अधिकृत घोषणा करते. दुसऱ्या टप्प्यात मूल्यांकन आयोग इच्छुक शहरांना भेटी देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेते. त्यातून निवडणुकीसाठी अंतिम यादी तयार केली जाते. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या परिषदेत सदस्य देशांच्या मतदानातून यजमान शहराची निवड होते.

यावर्षी लंडनला होणारी ही तिसरी स्पर्धा आहे. १९१६, १९४० आणि १९४४ अशा तीन स्पर्धा महायुद्धामुळे झाल्या नाहीत. यापूर्वी १९०८ आणि १९४८ मध्ये लंडनला स्पर्धा झाल्या होत्या.

स्पर्धा... सहा महिने चाललेली

यंदाची ऑलिंपिक स्पर्धा २७ जुलैला सुरू होईल व १२ ऑगस्टला स्पर्धेचा समारोप सोहळा आहे. म्हणजेच, लंडनमधील ही स्पर्धा १७ दिवस चालेल; पण १०४ वर्षांपूर्वी, म्हणजे १९०८ मध्ये लंडनमध्येच झालेली स्पर्धा तब्बल १८७ दिवस सुरू होती. २७ एप्रिल १९०८ रोजी सुरू झालेल्या या स्पर्धेचा समारोप सोहळा झाला सहा महिन्यांनंतर, म्हणजेच ३१ ऑक्टोबर १९०८ रोजी. या स्पर्धेत एकूण २२ देशांनी भाग घेतला होता. स्पर्धेचं दणक्यात उद्‌घाटन करण्याची सुरुवातही याच लंडन ऑलिंपिकपासून झाली.

नव्या विक्रमाच्या दिशेने

ऑलिंपिक स्पर्धांमध्ये संपूर्ण जगातील स्पर्धक सहभागी होत असतात. ऑलिंपिकच्या पदकतक्त्यावर नजर टाकली, तर त्यावर बलाढ्य देशांचंच वर्चस्व सहज दिसून

इतिहासाच्या नजरेतून ऑलिंपिक

* **ऑलिंपिकची मुहूर्तमेढ** - सुरुवात ख्रिस्तपूर्व ७७६ मध्ये. पुनरुज्जीवन १८९६.
* ऑलिंपिकचे ब्रीदवाक्य - 'सायटस, अल्टीअस आणि मोर्टियसम'; (अधिक वेगवान, अधिक उंच आणि अधिक बलिष्ठ).

* **ऑलिंपिकचे बोधचिन्ह** - वर तीन आणि खाली दोन, एकमेकांत गुंफलेली वर्तुळे. ही वर्तुळे म्हणजे जगातील पाच खंडांच्या एकात्मतेचा संदेश देणारे प्रतीकरूप आहे. पाच वर्तुळांचा रंगही वेगवेगळा असून, त्यातूनही एकीचा संदेश मिळतो. वरच्या वर्तुळांचे रंग अनुक्रमे निळा, काळा व लाल, तर खालच्या वर्तुळांचे रंग पिवळा व हिरवा असे आहेत. यांपैकी किमान एक रंग तरी जगातील प्रत्येक राष्ट्रध्वजात असतो.

* **ऑलिंपिकचा ध्वज** - पांढऱ्या शुभ्र सॅटिन कपड्यावर पाच वर्तुळांचे बोधचिन्ह असणारा ध्वज पहिल्यांदा १९२० च्या अँटवर्प ऑलिंपिकमध्ये फडकविण्यात आला.

* **ऑलिंपिकची ज्योत** - जुन्या आणि नव्या स्पर्धांना जोडणाऱ्या दुव्याचे ऑलिंपिक ज्योत म्हणजे एक प्रतीक आहे. प्राचीन काळी आग प्रज्वलित करण्यासाठी दगड किंवा सूर्यकिरणांची मदत घेतली जात असे. ऑलिंपिकमध्ये ही परंपरा आजही पाळली जाते. जगातील कोणत्याही शहरात ऑलिंपिक स्पर्धा असली तरीही जी मशाल ही ज्योत प्रज्वलित करते, ती अथेन्समधील ऑलिंपिया नगरीत सूर्याच्या किरणांनी प्रज्वलित करण्यात येते. ज्योतीचे आजचे स्वरूप १९३६च्या बर्लिन ऑलिंपिकमध्ये स्वीकारण्यात आले.

* **ऑलिंपिकची पदके** - १९००च्या स्पर्धेपासून पहिल्या तीन क्रमांकांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि ब्राँझ अशी पदके देण्यात येऊ लागली. परंतु खऱ्या सोन्याची पदके फक्त १९१२च्या स्पर्धांपर्यंत देण्यात येत होती. त्यानंतर म्हणजे १९२०च्या स्पर्धेपासून सोन्याचा मुलामा दिलेली पदके देण्यात येऊ लागली. येतं. पण १९९६ मध्ये अटलांटात झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेमध्ये एकाअर्थी पदकतक्त्यातही जगाचं प्रतिनिधित्व झालं.

या स्पर्धेमध्ये तब्बल १९७ देशांनी भाग घेतला होता. यातील ७९ देशांनी किमान एक तरी पदक मिळविले. हाही अनोखा विक्रमच आहे. या स्पर्धेचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, पॅलेस्टाईनला प्रथमच ऑलिंपिक सहभागाची परवानगी देण्यात आली. अटलांटामध्ये एकूण २४ देशांनी ऑलिंपिकमध्ये पदार्पण केलं.

यावर्षी तब्बल २०४ देश स्पर्धेत सहभागी होतील आणि खेळाडूंची संख्याही साडेदहा हजारांहून अधिक असेल...

सौदी अरेबियाचे महिलांवर निर्बंध

ऑलिंपिकमध्ये महिलांचा सहभाग १९००च्या पॅरिसमधील स्पर्धेपासून आहे. त्या स्पर्धेमध्ये जलतरण, 'कॉक्वेटम, टेनिस आदी क्रीडाप्रकारात महिला सहभागी झाल्या होत्या. पॅरिसमधील स्पर्धेत ब्रिटनच्या कार्लेट कूपर हिने टेनिसमध्ये विजेतेपद मिळविले होते. या घटनेला १०० वर्षांहून अधिका काळ लोटला तरी अजूनही अनेक देश स्पर्धेतील महिलांच्या सहभागाबाबत अनुत्सुक आहेत. किंबहुना अनेक देशांनी त्यांच्यावर सहभागी न होण्यासाठी निर्बंधही घातले आहेत. यावेळच्या स्पर्धेसाठी सौदी अरेबिया एकाही महिला खेळाडूला पाठविणार नाहीये. कतार आणि ब्रुनोईही महिला खेळाडूंना या स्पर्धेसाठी पाठविणार नव्हते. परंतु ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष जॅक्स रॉजी यांनी या देशांशी चर्चा केली व त्यांचे मतपरिवर्तन केले. पण सौदी अरेबिया अजूनही आपल्या मतांवर ठाम आहे. धार्मिक परंपरांशी याचा संबंध जोडला जात आहे. मतपरिवर्तन होण्याची आशा आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीला अजूनही आहे.

लंडनला छावणीचे स्वरूप

दहशतवादापासून क्रीडाक्षेत्रदेखील सुरक्षित नाही, हे १९७२ च्या म्युनिच ऑलिंपिकवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यावरून स्पष्ट झाले. (पॅलेस्टिनमधील 'ब्लॅक सप्टेंबर' या गटाच्या दहशतवाद्यांनी ऑलंपिक दरम्यान इस्राइलच्या संघाला ओलीस ठेवले होते. शेवटी इस्राइलच्या ११

। जरूर ऐका... आवडती भारी मला माझे आजोबा - ग. दि. माडगूळकर (गायिका - आशा भोसले)।

प्रायोजक – श्री. सुधीर विष्णु दफ्तरदार, पुणे

ॲथलिटस्ची दहशतवाद्यांनी हत्या केली होती. तर पोलीस कारवाईत ब्लॅक सप्टेंबर संघटनेचे ८ दहशतवादी मारले गेले होते.) आजही ही काळी घटना कुणाच्याच आठवणीतून जात नाही. तशा प्रकारची कोणतीही घटना घडू नये म्हणून लंडनमध्ये ऑलिंपिक क्रीडानगरीच्या परिसरात अत्यंत कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. सर्व महत्त्वाच्या ठिकाणी सैनिकांच्या तुकड्या सज्ज ठेवल्या आहेत. तसेच क्षेपणास्त्रेही सज्ज ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेच्या दरम्यान संपूर्ण शहरावर हेलिकॉप्टरद्वारे गस्त घातली जाणार आहे.

डोपिंगला आळा

गेल्या वीस एक वर्षांपासून जागतिक क्रीडाक्षेत्रात उत्तेजक (डोपिंग) हा चर्चेचा आणि वादाचा एक मोठा विषय बनला आहे. १९८८च्या ऑलिंपिक स्पर्धेत बेन जॉन्सनसारखा जागतिक कीर्तीचा मोठा मासा ऑलिंपिक वैद्यकीय मंडळाच्या गळाला लागला. त्यानंतर अनेक स्पर्धक उत्तेजक घेत असल्याचे आढळून आले आहे. भारताच्या महिला धावपटू, तसेच काही वेटलिफ्टर उत्तेजक चाचणीत अडकले आहेत. स्पर्धेच्यावेळी उत्तेजकांचा वापर होऊ नये यासाठी खेळाडूंची चाचणी करण्यास अत्यंत अत्याधुनिक प्रयोगशाळा क्रीडासंकुलात तयार करण्यात आली आहे.

दबदबा अमेरिकेचाच

आतापर्यंतच्या सर्व ऑलिंपिक स्पर्धांचा आढावा घेतला, तर अमेरिका, जर्मनी, रशिया, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, इटली, चीन या देशांनीच सर्वाधिक पदके मिळविल्याचे दिसून येईल. त्यातही सर्वाधिक ९२९ सुवर्णपदके अमेरिकेने, त्याखालोखाल ४०० जर्मनीने, ३९५ रशियाने मिळविली आहेत.

पदके

या ऑलिंपिकमध्ये देण्यात येणारी पदके ३७५ ते ४०० ग्रॅम वजनांची आणि सात मिलीमीटर जाडीची असतील. पदकांच्या एका बाजूला ग्रीक देवतेचे चित्र, तर दुसऱ्या बाजूला लंडन ऑलिंपिकचे बोधचिन्ह आहे.

क्रीडाप्रकारांची निवड

जगातील जास्तीत जास्त देशांत खेळल्या जाणाऱ्या खेळांचाच ऑलिंपिकमध्ये समावेश केला जातो. तीन खंडांत आणि ४० देशांत लोकप्रिय असलेल्या खेळाची निवड पुरुष गटासाठी, तर दोन खंडांत आणि २५ देशांत खेळल्या जाणाऱ्या खेळाची निवड महिला गटासाठी केली जाते. यावर्षी २६ क्रीडाप्रकार होणार आहेत. लंडन ऑलिंपिकची घोषणा झाली त्यावेळी बेसबॉल आणि सॉफ्टबॉलचा स्पर्धांमध्ये समावेश होता. परंतु, नंतर आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीने हे दोन खेळ रद्द केले. पुढील म्हणजे २०१६च्या ब्राझीलमधील ऑलिंपिक स्पर्धांसाठी यावर्षीच्या २६ खेळांव्यतिरिक्त रग्बी आणि गोल्फ या खेळांना मंजुरी दिली आहे.

दृष्टिक्षेपात लंडन ऑलिंपिक



ठिकाण : लंडन, ब्रिटन
घोषवाक्य :
इन्स्पायर अ जनरेशन
शुभंकर (मॅस्कॉट) : वेनलॉक आणि मांडेव्हिले
सहभागी देश : २०४
खेळाडू : १०,५०० हून अधिक (अंदाजे)
क्रीडाप्रकार : २६ खेळांचे ३०२ क्रीडाप्रकार
उद्घाटन : २७ जुलै २०१२
समारोप : १२ ऑगस्ट २०१२
पुढील ऑलिंपिक : २०१६ रिओ द जानिरो, ब्राझिल

भारताच्या आशा

आतापर्यंतच्या ऑलिंपिकमध्ये भारताने हॉकीमध्येच सर्वाधिक सुवर्णपदके मिळविली आहेत. गेल्या ऑलिंपिकला पात्र न ठरण्याची नामुष्की भारतावर आली होती. या ऑलिंपिकला मात्र पुरुष हॉकी संघ पात्र ठरला आहे. त्यांच्याकडून पदकाची अपेक्षा सध्यातरी कोणालाच वाटत नाही, परंतु चांगला खेळ करून भारतीयांनी मने जिंकावीत एवढी अपेक्षा मात्र आहे.

गेल्या ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक मिळविणारा नेमबाज अभिनव बिंद्रा याच्याकडून याहीवर्षी सर्वाधिक अपेक्षा

भारताच्या आशा

(साईना नेहवाल, विजयकुमार, अभिनव बिंद्रा, मेरी कोम, सुशीलकुमार)



आहेत. याशिवाय विजय कुमार याच्या कामगिरीकडेही सर्वांचे लक्ष असेल. २५ मीटर रॅपिड फायर हा त्याचा आवडता प्रकार आहे. ट्रॅप प्रकारात विश्वविजेतेपद मिळविणारा रंजन सोधीही सुवर्णपदकाच्या शर्यतीत आहे.

बॉक्सिंगमध्ये लाईट वेल्टरवेट गटातून खेळणारा मनोज कुमार, ६० किलो गटातील विकास कृष्ण, ४९ किलो गटातील देवेंद्रसिंह यांच्यामुळे बॉक्सिंग संघ मजबूत झाला आहे. लागोपाठ पाचवेळा महिला बॉक्सिंगचे जागतिक विजेतेपद मिळविणारी मेरी कोम पहिल्यांदाच ऑलिंपिकसाठी पात्र ठरली आहे.

तसेच गेल्यावेळी ब्राँझ पदक मिळविणारा बॉक्सर विजेंदर आणि कुस्तीगीर सुशीलकुमार यांच्याकडूनही पुन्हा पदकाच्या आशा आहेत.

मॅरेथॉनपटू राम यादव याच्या कामगिरीकडेही सर्वांचे लक्ष असेल. आशियाई स्पर्धेत दोन सुवर्ण पदके मिळविणारी अश्विनी अकुंजीसह सहा महिला ॲथलिटवर डोपिंगमुळे एक वर्षाची बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे भारताच्या टॉपच्या महिला ॲथलिट या स्पर्धेत दिसणार नाहीत.

बॅडमिंटनमध्ये ऑलिंपिक पदक मिळविण्याचे स्वप्न साईना नेहवालने बोलून दाखविले आहे. नुकत्याच झालेल्या दोन आंतरराष्ट्रीय स्पर्धांपैकी एक स्पर्धा जिंकून तिने चुणूक दाखविली आहे. मात्र तिच्यासमोर प्रमुख आव्हान असेल ते चिनी खेळाडूंचे.

टेनिसमध्ये सानिया मिर्झाकडूनही पदकाच्या अपेक्षा आहेत. पुरुष दुहेरीमध्ये महेश भुपती आणि लिएंडर पेसने एकत्रित खेळावे अशी अपेक्षा भारतीय ऑलिंपिक महासंघाने व्यक्त केली आहे. मात्र लिएंडरबरोबर खेळण्यास महेशने नकार दिला आहे. अन्यथा या जोडीला ऑलिंपिक पदक मिळण्याची आशा होती. याशिवाय तीरंदाज बोम्बल्या देवी हिच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे.

जगातील हा सर्वांत मोठा क्रीडा कुंभमेळा अनेक नव्या विक्रमांचा, नव्या प्रेरणांचा साक्षीदार असणार आहे. इतिहासात आपले नाव कोरण्याच्या ईर्ष्येने जिद्दीने खेळाडू आपले कौशल्य पणाला लावतील. समारोपाच्यावेळी या स्पर्धांनी स्पर्धेचे बोधवाक्य खरे केल्याची प्रचीतीच सर्वांना येईल.

चांगल्या कामगिरीसाठी सर्व खेळाडूंना शुभेच्छा !

**

सुरेंद्र पाटसकर
१३४८, सदाशिव पेठ, पुणे 411030
surendrapataskar@yahoo.com

। दिनविशेष... २३ जुलै जागतिक वनसंवर्धन दिन ।

प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.), पुणे

उजाडत आहे रे

शैलजा देशमुख

डॉ. सुधा कांकरिया

- ✻ स्त्री-भ्रूण हत्याविरोधी मोहीम-'स्त्री जन्माचे स्वागत करा' चळवळीच्या प्रणेत्या.
- ✻ या संदर्भात महाराष्ट्रव्यापी काम - ११ कलमी कृतिकार्यक्रमाची निर्मिती आणि अंमलबजावणी
- ✻ समाजप्रबोधनासाठी विविध उपक्रमांची आखणी, कार्यवाही
- ✻ विज्ञान साहित्य, समाजप्रबोधन इ. संदर्भातील उपक्रम-चळवळींमध्ये क्रियाशील
- ✻ वेगवेगळ्या विषयांवरील १२ पुस्तकांचे लेखन
- ✻ राष्ट्रपतींकडून कार्याविषयी दोन वेळा शाबासकी
- ✻ पत्ता - माणिक चौक, अहमदनगर 414001
इ-पत्ता -drsudha15@yahoo.com

गेल्या वर्षभरात 'सोनोग्राफी सेंटर्समधून अवैध मार्गाने होणारे गर्भलिंग निदान, मुलीचा गर्भ असेल तर होणारी निष्पाप जिवाची हत्या आणि ही हत्या रोखण्यासाठी होणारी कायद्याची अंमलबजावणी' या विषयांवरील बातम्या आपण सातत्याने वाचत आहोत. स्त्रियांची घटती संख्या हा आजचा मोठा चिंतेचा विषय आहे. स्त्री-भ्रूण हत्येमुळे सामाजिक समतोल बिघडला तर भविष्यात अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होऊ शकतात. या विषयाची जाग आज सर्व स्तरांवर आलेली दिसते. परंतु अहमदनगरच्या डॉ. सुधाताई कांकरिया यांनी आठ वर्षांपूर्वीच 'स्त्री जन्माचे स्वागत करा' ही महाराष्ट्रव्यापी चळवळ खूप मोठ्या प्रमाणावर सुरू केली. यातच त्यांचं काळाच्यापुढे चार पावलं चालणं, भोवतालच्या समाजस्थितीचं भान ठेवून मोठ्या प्रमाणावर जनजागृतीसाठी धडपडणं यातील वेगळेपण उठून दिसतं.

वडील श्री. नागनाथ फटाले हे जागरुक पत्रकार तर अध्यापनाच्या क्षेत्रात 'आदर्श' ठरलेली आई यांच्या संस्कारात सुधाताई लहानाच्या मोठ्या झाल्या. घरात सांस्कृतिकदृष्ट्या आदर्श असं वातावरण होतं. बहीण-भावंडांना समान वागणूक होती. रात्री झोपण्यापूर्वी सुधाताईंची आई मुलांना गोष्ट वाचून दाखवायची. त्या गोष्टींमधल्या लहान-मोठ्या, अवघड-बिकट, हलक्या-फुलक्या प्रसंगात सारीच जणं रमून जायची. आलेल्या परिस्थितीला कसं तोंड द्यायचं, मिळून मिसळून कसं वागायचं, आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीविषयीची जाणीव या त्यांच्या छोट्याशा घरगुती उपक्रमांतून झाली, असं सुधाताई सांगतात

फटाले कुटुंबात शिक्षणाला महत्त्व होतं. त्यामुळे सर्वच भावंडं उच्चशिक्षित ! आपलं शालेय शिक्षण औरंगाबादला यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर सुधाताईंनी वैद्यकीय शिक्षण आंबाजोगाईला घेतलं. कॅलिफोर्निया, रशिया येथील विद्यापीठातून उच्च शिक्षणासाठी त्यांना शिष्यवृत्ती (fellowship) मिळाली. नंतर आंतरजातीय विवाह करून त्या कांकरिया कुटुंबाच्या सदस्य बनल्या. हे कुटुंबही सुसंस्कृत व सुशिक्षित! सुधाताईंच्या कामाला सक्रिय पाठिंबा देणारं!!

विवाहानंतर अहमदनगर येथे सुधाताईंनी नेत्रतज्ज्ञ म्हणून काम पाहाण्यास सुरुवात केली. त्यावेळी स्त्री-रुग्णांची प्रकृती विषयी होणारी हेळसांड सुधाताईंच्या लक्षात आली. एकूणच पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला असणारं दुय्यम स्थान, घराण्याला वारस म्हणून 'मुलगा हवा, मुलगी नको' ही वृत्ती समाजात खोलवर रुजलेली पाहून त्यांचं मन अस्वस्थ झालं.

घेतली श्रमाची दीक्षा, श्रमाची बांधतो पूजा ।
हा उच्च, हा नीच, असा भाव नसे मनी दूजा ।।

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना

येणाऱ्या स्त्री रुग्णांचं याविषयी त्या समुपदेशन करू लागल्या. स्त्री-पुरुष समानतेचं महत्त्व पटवून देऊ लागल्या. पण नुसतं स्त्रियांना विषय समजावून देऊन भागण्यासारखं नव्हतं. मग त्या स्त्रियांच्या वाड्या-वस्त्यांवर जाऊन सुधाताई बोलू लागल्या. 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा असेल तर मुलगी म्हणजे पणती आहे' हे घरोघरी जाऊन सांगू लागल्या.

सुरुवातीला या संभाषणात पुरुषांचा सहभाग नसायचा. पण आता हळूहळू मनोधारणा बदलते आहे असं सुधाताई सांगतात. 'स्त्री-पुरुष समानता' याविषयीच्या सुमारे दीड हजारपेक्षा जास्त ठिकाणी सुधाताईंनी कार्यशाळा घेतल्या.

साताऱ्यातल्या एका गावी कार्यशाळा संपल्यानंतर अंगणवाडीतल्या एक ताई सुधाताईंपाशी आल्या आणि 'मला जीवन नकोसं' झालंय असं म्हणू लागल्या. '''नकोशी' नाव असलेल्या मुलीला जीवन हवंसं कसं वाटेल?'' असं विचारून सुधाताईंनी 'नकोशीला करूया हवीशी' ही मोहीम सुरू केली. आजपर्यंत ८३५ महिलांचं अशा पद्धतीने त्यांनी नामकरण केलं आहे.

आज एकविसाव्या शतकातही 'नकोशी' नावाच्या इतक्या मुली पाहिल्यावर 'नकोशीला करूया हवीशी' या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित होतं. मुलीला 'नकोशी' ठरवून एवढ्यावरच थांबत नाही; तर मुलीचा गर्भ आहे हे कळल्यावर हा गर्भ पाडला जातो. मुलगी म्हणून त्या जिवाची आईच्या पोटातच हत्या होते. किती भयानक/भीषण प्रकार ! पण आज खेडोपाड्यांतूनच नाही तर शहरांतूनही ही समस्या दिसते आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून तर अशी हत्या म्हणजे अक्षम्य गुन्हा आहेच आहे. पण अशाप्रकारे मुलींची संख्या दिवसेंदिवस घटते आहे. त्याचे काय? आत्ता ० ते ६ वयोगटातील दरहजारी मुलांमागे भारतात मुलींचे प्रमाण ९१४ तर महाराष्ट्रात ते ८८३ आहे. महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात तर हे प्रमाण जवळजवळ निम्मं म्हणजे हजारी ५५० इतकं कमी आहे. यातून उद्या कोणती भयावह सामाजिक परिस्थिती उभी राहाणार आहे, याची आपल्याला कल्पना असते का? सुधाताई विचारतात. प्रकृती आणि पुरुष ही खरंतर निसर्गाची २ चाकं. पैकी १ चाक जर अशारीतीने आपण जाणूनबुजून कमी करणार असू तर हा निसर्ग वाढणार कसा, बहरणार-फुलणार कसा? भावाला बहीण, नवऱ्याला बायको मिळणार कशी?

केवळ समुपदेशन, कार्यशाळा घेणं हा यावरचा उपाय नाही हे सुधाताईंच्या लक्षात यायला लागलं. मुली का नकोशा वाटतात याचा सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक

। अभिनंदन... ज्येष्ठ बुद्धिबळपटू - विश्वनाथन आनंद (सलग पाचव्यांदा विश्वविजेतेपद)।

प्रायोजक –स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे

स्तरावर त्यांनी अभ्यास केला. यावर ठोस कृती करण्याची गरज त्यांच्या लक्षात आली आणि यातूनच प्रयत्नपूर्वक अकरा कलमी कृतिकार्याची मांडणी केली.

स्त्री-जन्माच्या स्वागताचा संकल्प करणे, त्या त्या परिसराचा अभ्यास करून या चळवळीचा प्रचार-प्रसार करणे, लोकसहभागातून मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक गुंतवणूक करणे, पोटात वाढणाऱ्या स्त्री-गर्भासाठी ती स्त्री जबाबदार नाही याविषयीची जागृती करणे, नकोशीचं हवीशी नामकरण करणे, सामूहिक शपथ घेणे आदि कृतिकार्यक्रम या चळवळी अंतर्गत घेतले जातात.

'भारत माझा देश आहे' ही शपथ शाळा - शाळांमधून, सरकारी कार्यालयांतून रोज सामूहिकरित्या म्हटली जाते. ही शपथ आपल्या सगळ्या भारतीयांच्या परिचयाची आहे, जिव्हाळ्याची आहे, अभिमानाचीही आहे. या शपथेप्रमाणेच स्त्री-पुरुष समानता, स्त्री - जन्माचे स्वागत इत्यादी गोष्टींची भर असलेली नवी शपथ तयार करणे ही काळाची गरज बनली आहे. अशी नवीन शपथ सुधाताईंनी तयार केली. महिला दिनाचे, महाराष्ट्रदिनाचे व स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सुधाताईंनी महाराष्ट्रभरातील प्रत्येक ग्रामपंचायतीला याविषयीची माहिती व शपथ पाठविली. अनेक ग्रामसभांमध्ये त्यांचे वाचन होऊन शपथ घेण्यात आली.

विवाहानिमित्त घेण्यात येणाऱ्या सात फेऱ्यांबरोबर स्त्री-जन्माच्या स्वागताचा आठवा फेरा घेण्यात यावा, अशी नवीन कल्पना सुधाताईंनी मांडली. त्यासाठी

''लेकाएवढीच लेकही भारी, हाच संदेश घरोघरी ।
आठवा फेरा घेऊया, स्त्री जन्माचे स्वागत करूया''।।

हा मंत्रही त्यांनी तयार केला. वधु-वर-पालक परिचय मेळाव्यांमधूनही या विचाराचा प्रसार त्यांनी केला. आजवर अशा प्रकारचे २६४ विवाह संपन्न झाले आहेत.

'स्त्री जन्माचे स्वागत करा' या चळवळीच्या अनुषंगाने २००७ साली सुधाताईंनी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची भेट घेतली. त्यांनी स्वत:च्या

राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्याकडून कौतुक

हस्ताक्षरात ''सर्वांनी एकत्र येऊन ही चळवळ यशस्वी करावी,'' असा संदेश लिहून स्वाक्षरी केली. सामूहिक शपथ व ''आठवा फेरा स्त्री जन्माच्या स्वागताचा'' या उपक्रमाचे राष्ट्रपतींनीही विशेष कौतुक केले आहे.

दहा राज्यातून आलेल्या प्रतिनिधींसाठी सुधाताईंनी एक राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली होती. चळवळीची माहिती, स्थानिक पातळीवरचा अभ्यास, या प्रश्नाचे भविष्यातील भीषण स्वरूप आदी बाबी त्यांनी या प्रतिनिधींसमोर ठेवल्या. कार्यशाळा व प्रबोधन कार्यक्रमाच्या माध्यमातून सुमारे पाच लाखांपेक्षा जास्त व्यक्तींना सुधाताईंनी आतापर्यंत स्त्री जन्माच्या स्वागताची सामूहिक शपथ दिली. २००८ व २००९ ही सलग दोन वर्षे राज्यभरातील ग्रामसभेतून शपथ घेतली गेली. समाजातील विविध संघटनांचे मौलिक सहकार्य त्यांना लाभले आहे. महिला, युवक, स्वयंसेवी संघटना, प्रशासन, लोकप्रतिनिधी, पत्रकार, उद्योजक, आरोग्य विभाग इ. ची मदत घेत सर्वांना बरोबर घेऊन सुधाताईंचे काम चालू आहे.

वृत्तपत्रातील लेखमाला, नाटिका, कविता इ. च्या माध्यमातूनही सुधाताईंनी समाजप्रबोधनाचा प्रयत्न केला. विविध धार्मिक उत्सव, सामाजिक उत्सव-

गंधाचे ऋतू फुलात उमलताना पाहिले ।
भावनांचे अंतरात किती कल्लोळ उठले ।।

स्त्री जन्माचे स्वागत

प्रसंगांचा प्रचारासाठी त्या अतिशय प्रभावीपणे वापर करतात. युवकांसाठीच्या निबंध स्पर्धेसाठी 'मी हुंडा घेणार नाही, मी हुंडा देणार नाही' यासारखे विषय ठेवण्यात त्यांची कल्पकता दिसते. सासू-सून नातं सुधारणे, मुलीच्या शिक्षणाकडे, पोषणाकडे, स्वावलंबनाकडे अधिक लक्ष देणे, स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन सुसंस्कृत असणे यावरही भर द्यावा असे सुधाताई आवर्जून सांगतात. हुंडाबळी, स्त्री अत्याचार इ. विषयी असलेले कायद्याचे कठोर पालन, त्यासाठी सकारात्मक सामाजिक दबाव असावा अशी सुधाताईंची धारणा आहे.

कुसुमाग्रजांनी आपल्या एका कवितेत म्हटलंय,

''साऱ्याच कळ्यांना जन्मसिद्ध हक्क असतो फुलण्याचा।
जमिनीतला वतनवारसा आभाळभर कोरण्याचा ।।''

हाच ध्यास घेऊन मुलींना फुलण्याचा हक्क मिळवून देण्याचा वसा सुधाताईंनी घेतलाय. गावोगावी याविषयी जागृती निर्माण करण्यात त्यांना यशही मिळतंय. पण समाजातील परिवर्तन ही हळूहळू चालणारी प्रक्रिया असते. त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतात. सुधाताईंच्या या उपक्रमात आपल्या परीने आपणही सहभागी होऊ शकू. 'स्त्री'चं दु:ख समजण्यासाठी मन संवेदनशील हवं. सुधाताईंच्यातील लेखक, कलाकार डॉक्टर सतत जागा असल्यामुळेच त्या आपलं काम जीव ओतून करू शकतात. एका कवितेत त्या म्हणतात,

''एक उणे एक होते शून्य ! शून्याकडे प्रवास करू नका
जगाला वाचवण्यासाठी स्त्रीजन्माचे स्वागत करा''

त्यांच्या कवितेतील हा स्त्रियांविषयीचा कळवळा त्यांनी अंगिकारलेल्या कामातून आलाय. म्हणूनच त्यात एक सच्चेपण आहे. स्त्रियांचे प्रमाण भविष्यात नक्की वाढणार याविषयी त्यांना म्हणूनच विश्वास वाटतो.

**

– शैलजा देशमुख
सी–१०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २,
पुणे 411009

मुखपृष्ठ चित्रकार

नाव : राहुल देशपांडे
जन्म : ५जून १९७१.
शैक्षणिक पात्रता : ॲप्लाईड आर्ट पदवी, जे. जे. इन्स्टिट्यूट मुंबई.

देशपांडे सर गेली २१ वर्षे चित्रकलेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांची चित्रकलेवरील मास्टर आर्टिस्ट सिरिज, स्केचिंग अँड ड्रॉइंग इ. पुस्तकमाला प्रकाशित झाल्या आहेत. तसेच त्यांनी चित्रकलेवरील सुमारे १० पुस्तकांचे लेखन व संपादन केले आहे. जलरंग, तैलरंग, ॲक्रेलिक, पेस्टल अशा विविध माध्यमांत ते चित्रनिर्मिती करतात. राजस्थान व कोकण अशा अनेक ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष चित्रण करण्याकडे त्यांचा कल आहे. आपल्या चित्रप्रदर्शनांतून विविध कलाकृती सादर करताना चित्रविषय व मांडणीतील वेगळेपणा याबाबत ते प्रयोगशील असतात. त्यांना प्रतिष्ठेचा 'पंडित सातवळेकर पुरस्कार'ही प्राप्त झाला आहे.

१३, ईशान सहनिवास, ३८ श्रीराम सोसा. वारजे नाका, वारजे, पुणे ४११०५८
rahuldeshpande.in@gmail.com जरूर भेट द्या - www.rahuldeshpandefineart.com

। दिनविशेष... २६ जुलै, कारगिल दिन ।

प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट, प्रा. लि., पुणे

दिंडी चालली तीर्थक्षेत्राला

कु. अपूर्वा कारंडे

मित्र-मैत्रिणींनो तुम्ही वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये भाग घेता, बक्षिसं, पुरस्कारही मिळवता, हो ना? तुमचं हे यश आमच्यापर्यंत नक्की पोचवा. चांगल्या निबंध-चित्र-प्रकाशचित्र यांना अंकातून जरूर प्रसिद्धी दिली जाईल.

''स्व. आचार्य शांतिसागर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०११'' या स्पर्धेत विशेष प्रावीण्यासह प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या अपूर्वाचा हा पंढरीच्या वारी संदर्भातला लेख तुम्ही वाचावात. अपूर्वाचेही आपण सगळे मिळून कौतुक करूयात.

विश्वबंधुत्व व प्रेमाची शिकवण साऱ्या जगताला देणाऱ्या भारत खंडामध्ये परमेश्वराची आराधना विविध तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी केली जाते. आंध्रात तिरुपती बालाजी, केरळमध्ये गुरुवायुरप्पन तसेच कर्नाटकात उड्डपी कृष्णाच्या व गुजरातमध्ये द्वारकाधीशाच्या रूपात तर महाराष्ट्राच्या आध्यात्मिक राजधानीत-पंढरपुरात श्री विठ्ठलाच्या रूपात परमेश्वराची भक्तिपूजा होते.

दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूरच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी, लाखो वारकरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो किलोमीटरचे अंतर पायी चालत पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करतात, त्यालाच आपण दिंडी म्हणतो.

शेकडो वर्षांपासून आळंदीहून निघणारी ज्ञानेश्वर माऊलींची दिंडी, देहूहून निघणारी तुकाराम महाराजांची दिंडी, शेगावहून निघणारी गजानन महाराजांची दिंडी ही तर जगातील आश्चर्येच मानली जातात.

लाखो भाविक पांडुरंगाच्या दर्शनाची आस मनात बाळगून शेकडो मैलाचे अंतर ऊन-पावसाचा मारा झेलत, अवघड घाटमाथा चढत, अनंत कष्ट सोसत स्वेच्छेने व आनंदाने एकत्र येतात. गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, अबाल-वृद्ध हा भेदाभेद विसरून समाजातील सर्वच थरातील, जाती-धर्मातील भाविक या भक्तिमय सोहळ्यात आनंदाने सहभागी झालेले दिसतात. शेकडो मैल दूरवरून निघालेल्या दिंड्या हे जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेही नसलेले एक प्रभावी असे गुरुकुल आहे.

दिंडी म्हणजे लाखो लोकांना एकत्र आणून एकाच ध्येयाकडे वाटचाल करायला लावणारी एक मोठी संघटना आहे. यातील असंख्य भाविकांचा सहभाग म्हणजे स्वेच्छेने एकत्र आलेला जनसमुदाय असतो. तो नि:स्वार्थी असतो, समविचारी असतो म्हणूनच त्यांचे संघटन शेकडो वर्षे टिकून राहिलेले दिसते. कुठल्याही अलौकिक मूल्याशिवाय, अमूल्य संस्कारांची ठेव ओंजळीत देणारं हे एक खऱ्या अर्थानं 'मुक्त विद्यापीठ' आहे. येथे परंपरेच्या नसानसातून आलेलं समतेचं तत्त्व आहे. वर्तमानात जगण्याचं भान आहे.

नियोजन हा व्यवस्थापन कार्याचा केंद्रबिंदू होय. पंढरीकडे वाटचाल करणाऱ्या या लाखो लोकांच्या दिंडीचा कार्यक्रम पाहिला; त्यात सामील होणाऱ्या

घडलेल्या घटनांचे नसावे काहीच ओझे ।
आपल्या वर्तमानाचे आपणच व्हावे राजे ।।

वारकऱ्यांचा नित्यक्रम पाहिला; तर व्यक्तीच्या, समष्टीच्या जीवनातील उत्तम नियोजनाचा अनुभव येतो. देहूहून किंवा आळंदीहून निघणारी, शेगावहून किंवा इतर कुठल्याही लहानमोठ्या गावाहून निघाल्यापासून आषाढी एकादशीला पंढरपूरला पोहोचेपर्यंत त्यांचा प्रवास, झोप, विश्रांती, पूजा-अर्चा, भजन-कीर्तन, भोजन व पुढील मुक्कामापर्यंतचा प्रवास हा सर्व भाग उत्तम नियोजनाखेरीज शक्यच नाही. 'इव्हेन्ट मॅनेजमेंट'चा हा उत्कृष्ट नमुना आहे.

दिंडीत चालणारा प्रत्येक वारकरी हा माऊलीमय बनतो. तिथे लहान-थोर, वरिष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच ही भावनाच विरळ होते. प्रत्येक वारकरी हा समतेच्या विचारप्रवाहात विलीन झालेला थेंब असतो. प्रत्येकजण हा दुसऱ्याच्या पायाशी लीन होतो. विचारांची आणि आचाराची एकरूपता निर्माण होते व याचा परमानंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसतो. स्वार्थ, क्रोध, मत्सर नाहीसे होऊन परस्पर सुसंवाद घडतो. समाज - स्वास्थ्यासाठी अशाच वातावरणाची गरज असते.

संपूर्ण दिंडी सोहळ्याचे सर्वांत प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे शिस्तबद्ध वर्तणूक.

वेळेच्या नियोजनात या दिंडी सोहळ्याइतके चांगले उदाहरण शोधूनही सापडणार नाही. 'टाईम मॅनेजमेंट' म्हणजे काय हे वारकऱ्यांकडून शिकावे. पालखीचे प्रस्थान, मुक्काम, मुक्कामाचे ठिकाण, मुक्कामाची वेळ, दिवस अगदी ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे चालते. त्यात कधीही विलंब होत नाही. की खंड पडत नाही. सर्वच बाबतीत वेळेचे काटेकोर नियोजन होताना दिसते.

दिंडीत आत्मनियंत्रण, स्वार्थत्याग व नियमितपणा हे गुण अवश्य दिसून येतात. परमेश्वराची आराधना करणे हे या वारकऱ्यांचे अंतिम उद्‌दिष्ट असते.

धर्माधर्मांत, जातीजातीत तेढ निर्माण होत असलेल्या वातावरणात खऱ्या अर्थाने सर्वसमभावाचा, खरा अनुभव या दिंडी सोहळ्यात दिसतो. नैतिकतेचे संपूर्ण अधिष्ठान असलेली ही उत्कृष्ट आचारसंहिता आहे. त्यात स्वाभिमान, स्वधर्म, स्वकष्ट, स्वावलंबन व प्रामाणिकपणा ही पंचसूत्री आहे.

आपले घरदार, संसार-परिवार, शेतीवाडी या सर्वांचा काही काळ निरोप घेऊन अगदी निवांतपणे भगवद्‌भजन करीत

'माझे जीवाचे आवडी। पंढरपूरा नेईन गुढी।'

असे नाचतगात वारकरी पंढरीकडे जातात. त्यांना केवळ श्रीविठ्ठलाचे समचरण पाहावयाचे असतात. त्याचे समोर कान धरून उड्या मारायच्या असतात. 'जे काही चुकले-माकले ते सुधारून, सांभाळून घ्या' असे देवाला विनवायचे असते.

दिंडीच्या काळात भूमीही रोमांचित, पुलकित झालेली असते. वरुणराजा अवतरलेला असतो. माळरानावर हिरवेगार गालिचे अंथरलेले असतात. नदीनाले, ओढे खळाळत आपला प्रवास पुन्हा एकदा ताज्या दमाने 'हरिओम्' म्हणून सुरू करीत जातात.

श्रमपूजक शेतकरी, कष्टकरी आपापली शेतीभातीची कामे मोठ्या उत्साहाने पुरी करून 'निवांत मनाने आता देवदर्शन करूया, 'स्वकर्मकुसुमांनी केलेली पूजा' देवाला अर्पण करूया. दिंडीला जाऊया' असे म्हणतात. असा हा उत्कट, अकृत्रिम उत्साह असतो.

भारतात अनेक भक्तिसंप्रदाय वेळोवेळी निर्माण झाले. महाराष्ट्रातही झाले. काळाच्या ओघात ही आंदोलने मागे पडली किंवा त्यांना ओहोटी लागली. परंतु वारकरी विठ्ठलभक्तांचे जनआंदोलन मात्र दिंडीच्या रूपात निरंतर टिकून आहे. म्हणूनच म्हणावेसे वाटते,

'पाऊले चालती पंढरीची वाट ।'
'अवघे गर्जे पंढरपूर,
चालला नामाचा गजर ।'

✻✻

कु. अपूर्वा कारंडे (इ. ९ वी)
ज्ञान प्रबोधिनी, बालविकास मंदिर,
सोलापूर 413001

। अभिनंदन... लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रा. चि. ढेरे - 'प्रिय जीए सन्मान'।

प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

छात्र प्रबोधन जोडीकार्य उपक्रम २०१२

मागीलवर्षीप्रमाणेच याहीवर्षी (एप्रिल-मे २०१२) 'छात्र प्रबोधन'तर्फे ७ वी ते १२ वी मुलामुलींसाठी 'जोडीकार्य' हा उपक्रम राबविण्यात आला. त्याला अतिशय सुंदर प्रतिसाद मिळाला. मुंबई, इंदापूर, कर्जत (जि. अहमदनगर), इचलकरंजी तसेच पुणे येथून सुमारे २५ जोड्या या उपक्रमात सहभागी झाल्या. त्यातील बऱ्याच मुला-मुलींनी त्यांना दिलेली जोडीकार्ये अतिशय उत्साहाने पार पाडली. काही जोडीकार्ये साहसी प्रकारातील, काही व्यावहारिक कौशल्यांना वाव देणारी, बुद्धीला खाद्य देणारी तर काही सामाजिक परिस्थितीची जाणीव करून देणारी व मुलांना विचार करायला लावणारी होती. मुलांनी दिलेल्या प्रतिक्रियांवरून जाणवते की ५ ते ६ किमी अंतरावरील एखाद्या प्रेक्षणीय स्थळास, ५ ते ६ जणांचा गट जमवून सायकल सहल आयोजित करणे तसेच जवळच्या ३ री व ४ थीच्या मुलांचा ३ तास एक छोटा मेळावा आयोजित करणे, ही जोडीकार्ये मुलांना खूपच आवडली. ती मुलांच्या नेतृत्व गुणांना प्रोत्साहन देणारी ठरली. हिंदू धर्माव्यतिरिक्त इतर ३ धर्मांच्या चालीरीती, सणसमारंभ, पोशाख, पदार्थ याबद्दल माहिती मिळवणे हे जोडीकार्य करतानाही खूप मजा आली व बरीच नवीन माहिती यानिमित्ताने मुलांना समजली असे मुलांशी झालेल्या संवादातून लक्षात येते.

या जोडीकार्यातील सहभागी मुला-मुलींसाठी साहस सहल आयोजित करण्यात आली होती. प्रतिसादाअभावी मुलांची सहल होऊ शकली नाही पण मुलींची सहल मात्र (४ ते ७ जून या कालावधीत) कोंढाण्याची लेणी, राजमाची किल्ला, ढाकचा किल्ला (जि. रायगड) येथे जाऊन आली. जवळजवळ ३० मुलींनी या साहससहलीचा आंनद लुटला. ७ जोडीकार्य पूर्ण केल्यास सहल शुल्कात १०० रु. सवलत ठेवण्यात आली होती. या संधीचा लाभही काही मुलींना मिळाला. येत्या दिवाळीच्या सुट्टीतही हा उपक्रम चालू करावा, असे सहभागी मुलामुलींनी आवर्जून सांगितले.

– शुभांगी सोलापूरकर

तन्मयी कुलकर्णी, सावित्री उपाध्ये (इचलकरंजी) यांचा जोडीकार्याबद्दलचा बोलका अनुभव –

...आम्हाला शुभांगी ताईनं जोडीकार्य दिलं ते म्हणजे आपल्या आईबाबांच्या तीन पिढ्यांचा वेगळा वंशवृक्ष तयार करायचा. ''बापरे कुठून काढायची सगळ्यांची नावं असं आम्हाला वाटलं.''

या संदर्भात बोलताना आईनं सांगितलं तेव्हा कळलं की माझे पणजोबा हे एक स्वातंत्र्य सैनिक होते. ते देशभक्त होते. त्यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामामध्ये भाग घेतला होता. तेव्हा मला खूप अभिमान वाटला. त्यानंतर बाबांनीही त्यांच्या मागच्या पिढ्यांची माहिती मला सांगितली.

...त्यानंतर चौथं जोडीकार्य होतं फुलं आणून त्याचे गजरे तयार करायचे आणि ते विकायचे. मला ते ऐकून इतकं हसू आलं की बस्स! त्यादिवशी संध्याकाळी आम्ही खूप फिरलो पण कुठंच सुटी फुलं मिळाली नाहीत. मग आम्ही बसस्टँडच्या तिकडे गेलो. तिथले गजरेवाले सुटी फुलं देईनात. मग आम्ही सांगितलं, 'आम्ही शिबिर करतोय त्यात सांगितलं आहे. यामुळे तुम्ही गजरे कसे करता, कसे विकता ते आम्हाला समजेल.' मग त्याने लगेच आम्हाला फुलं दिली. ती कशी ओवायची हे आम्हाला पाटीलवाड्यात नेऊन दाखवलं. तिथे लहान मुलं पण कशी पटापटा फुलं ओवत होती, गजरे करत होती. पण त्यांच्याप्रमाणे मला गजरे करता आले नाहीत. मी आपलं साधं ओवले व आमच्याच गल्लीत घरोघरी विकले. गल्लीतल्या लोकांना आमचं अर्थातच कौतुक वाटलं.

येन केन प्रकारेण प्रसिद्धी कशास हवी ।
प्रसिद्धी पेक्षा कीर्तीची आहे खरी थोरवी ।।

११ जुलै – जागतिक लोकसंख्या दिन (World Population Day)

११ जुलै १९८७ रोजी लोकसंख्या ५ अब्जापेक्षा जास्त होती. १९८९ या वर्षी युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडाच्या गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून साजरा करायचा अशी घोषणा केली. २०१२ साली जगाची लोकसंख्या ७ अब्जापेक्षा जास्त आहे. एकूणच आयुष्यमान वाढलं आहे, विविध आणि उच्च प्रकारच्या संशोधनामुळे अनेक अडचणींवर मानवानं मात केली असली तरी येणाऱ्या पिढीला रोज नवीन आव्हानाला तोंड द्यावे लागणार आहे. जगात चीनचा लोकसंख्येत पहिला नंबर आहे, तर भारताचा दुसरा. २०१२ च्या जनगणनेनुसार उत्तर भारताची लोकसंख्या सर्वात अधिक आहे, तर महाराष्ट्राचा दुसरा नंबर लागतो. सर्वात कमी लोकसंख्या 'लक्षद्विप' येथे आहे.

हे आवर्जून करा – □□ तुमच्या सोसायटीत/घराजवळच्या भागात किती लोक राहतात याची गणना करा. (किमान ५० घरांमध्ये जा.) □□ ज्येष्ठ नागरिक, युवक, बालक, पालक किती आहेत याची नोंद करा. □□ साक्षर–निरक्षरांचे प्रमाण किती आहे? हे ही तपासून पाहा. □□ मुली, स्त्रिया, मुलं, पुरूष किती आहेत, त्यांचे गुणोत्तर कसे आहे ह्याची नोंद ठेवा. □□ वयोगटानुसार, कामाच्या प्रकारानुसार, शिक्षणानुसार, आर्थिक स्तरानुसार या लोकसंख्येचे वर्गीकरण करा.

६ 'क्लिक' करण्यापूर्वी

मित्रहो, मलपृष्ठावरील फळांचे प्रकाशचित्र एकूण सजीव वाटते, हो ना? या फोटोत प्रकाशयोजना आणि मांडणी (arrangment) हे दोन्ही घटक महत्त्वाचे आहेत. त्यामुळे प्रकाशचित्राला निर्मितीमूल्य प्राप्त झाले आहे. फळांच्या वैशिष्ट्यपूर्ण मांडणीमुळे त्यांचे आकार हुबेहुब मनावर ठसतात. तर प्रभावी प्रकाशयोजनेमुळे फळांचा पोत (texure) हा नजरेत भरतोय.

– डॉ. राजेंद्र महामुनी, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे – ४

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० आषाढ, शके १९३४, १ जुलै २०१२ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे–२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

जाग हे शार्दूल जाग

जाग हे शार्दूल जाग, जाग हे पुराणपुरुष
सदियों की निंद छोड, आत्मवंचना को त्याग,
जाग हे पुराणपरुष, जाग हे शार्दूल जाग।।धृ।।

शृंखला में बद्ध हो, विद्ध हो पर चक्र से
मूर्छना से बेखबर, और गलित गात्र से
वेदि मे अंगार तेरे, छानलो ये राखराख।।१।।

धर्म तेरे प्राण है, अध्यात्मही अभिमान है
वेद तेरी शान और, वेदान्तही पहचान है
आत्मग्लानि से जगो, तब चलेंगे साथ भाग।।२।।

तू स्वयं नचिकेत है, हे सत्यव्रत, हे धैर्यधर
तम से तेज मार्गपर,चल मृत्यु से अम्रित की ओर
दीपस्तंभ तुमही हो, तुमही बुद्ध ग्यान, जान।।३।।

कैलाश से ओम्कार की, ध्वनित गुंज को सुनो
उदधियों की गाज में, विनित अर्चना सुनो।।
आसिंधु सिंधू भूमि ने तो, कबसे ली है ठान, आज।।४ ।।

कभी न थे विकलांग तुम, हिमाद्री से उत्तुंग तुम
क्लैब्य को तुम छोड दो, पुरुषार्थ से हो युक्त तुम
जरा से न डर जरा, उठो युवा-रक्त तुम
दासता के डोर तोड, सदियों से हो मुक्त तुम ।।५ ।।

उत्तिष्ठत! जाग्रत!! प्राप्य वरान्, निबोधत!!!
जयतु भारत, भाग्यशाली.. जय हो तेरी तेजरत!!!
जय हो तेरी तेजरत, जय हो तेरी तेजरत...!

स्वामी विवेकानंद
शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त
त्यांच्या विचारांवर आधारित
गीतमाला -७

सुमारे १००-१२५ वर्षांपूर्वी भारताचं रूप 'रुढी-परंपरांच्या पाशात पुरता जखडलेला, अशिक्षित, आत्मविश्वास हरवलेला, चैतन्य हरवलेला देश' असं होतं. अशा या निद्रिस्त भारताला जागं करण्याचं मोठं काम त्यावेळी स्वामी विवेकानंदांनी केलं. हा देश, इथला समाज सामर्थ्यशाली, प्रतिभासंपन्न आहे; असा विश्वास स्वामी विवेकानंदांना होता. त्यामुळेच 'उत्तिष्ठत, जाग्रत' असं म्हणून सिंहाप्रमाणे ताकदवान असणाऱ्या समाजपुरुषाला त्यांनी केलेलं आवाहन कवयित्री **डॉ. सुहासिनी देशपांडे** या पद्यातून सांगू इच्छितात. समृद्ध परंपरा असणाऱ्या पण त्या चक्रात न अडकलेल्या; नसानसात तरुण रक्त असणाऱ्या; धर्म, अध्यात्म प्रमाण असणाऱ्या हे समाजपुरुषा जागा हो. अपंग, अशक्त, वृद्ध अशी तुझी ओळख नाही. तू धैर्यवान, सत्यवान एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे आहेस. अंधाराकडून प्रकाशाकडे, अज्ञानाकडून ज्ञानाकडे तुझी वाटचाल होऊ देत. कैलासामधून उठणारा ॐकार आणि सागराची गाजही 'आसेतू हिमाचल आता जागा होणार आहे,' हे सांगत आहेत, ते जरूर ऐक. हिमलयापेक्षा उत्तुंग अशा हे युवा भारता ऊठ, जागा हो.

स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणूया!... ७

गप्पागोष्टीत स्वत:ची ताकत घालवू नका. एकांतात बसून ध्यान करा. मौनातून शक्तिसंचय करा.

- शाळेतील प्रार्थनेच्या वेळी मी टिवल्याबावल्या करणार नाही.
- मी रोज ठरवून दहा मिनिटे झोपण्यापूर्वी अथवा सकाळी सर्व आवरून झाल्यावर स्वस्थ, शांत बसेन.

सौर आषाढ, शके १९३४/ जुलै २०१२, पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

क्लिक करण्यापूर्वी !

(पान क्र. ३२)

सौर दिनदर्शिका शके १९३४

	जुलै २०१२	आषाढ / श्रावण
र.	1	१०
सो.	2	११
मं.	3	१२
बु.	4	१३
गु.	5	१४
शु.	6	१५
श.	7	१६
र.	8	१७
सो.	9	१८
मं.	10	१९
बु.	11	२०
गु.	12	२१
शु.	13	२२
श.	14	२३
र.	15	२४
सो.	16	२५
मं.	17	२६
बु.	18	२७
गु.	19	२८
शु.	20	२९
श.	21	३०
र.	22	३१
सो.	23	आ. १
मं.	24	२
बु.	25	३
गु.	26	४
शु.	27	५
श.	28	६
र.	29	७
सो.	30	८
मं.	31	९

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 12-10/July 12 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
या अंकाची किंमत : ₹ १५/-
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-
प्रकाशन दिनांक :
सौर १० आषाढ, शके १९३४
१ जुलै २०१२
www.chhatraprabodhan.org
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -